# ।। राजयोग ।।


## भक्तियुक्त कर्मयोग

**२१ व्या शतकातील वैज्ञानिक काळात श्रीमद् भगवद्गीतेचे व्यावहारिक ज्ञान**

(वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक व राजनीतिक जीवनाचा यशोमार्ग)

**(सचित्र मराठी आवृत्ती - संपूर्ण)**

पुस्तकाची मांडणी व ५ भाग




**श्रीमद्भगवद्गीतेतील अंतर्निहित शिकवणींचे वास्तविक ज्ञान**

**(भक्तियुक्त कर्मयोग : सनातन धर्माची मूळ शिकवण)**


**द्वारा : श्रीकांत रामचंद्र देशमुख**

BYK YOG

# BYK योग आध्यात्मिक फोरम

Registration Number
L-156331/2024

**प्रकाशक :** BYK **योग आध्यात्मिक फोरम**
पत्ता : फ्लॅट नं.३, गृहकुल अपार्टमेंट, प्लॉट नं. ५, बन्सीलालनगर,
श्री स्वामी समर्थ केंद्राजवळ, छत्रपती संभाजीनगर-४३१ ००५ (महाराष्ट्र)
CIN : U85300MH2022NPL389295 Mobile : 9823240823
Email : contact@bykyog.com / info@bykyog.com, Website : www.bykyog.com

सातवी आवृत्ती : बुधवार, १ जानेवारी २०२५, २००० प्रती

**संपर्क प्रमुख :** श्री. विलास मधुकरराव जोशी गुरुजी
(भगवान श्री हनुमान भक्त), वेदशास्त्र आचार्य
पंडित, विवेचक व मार्गदर्शक : श्रीमद्भगवद्गीता, श्रीमद्भागवतम्, श्रीरामचरितमानस, शिवपुराण, देवीभागवतम्. ज्योतिषशास्त्र, वास्तुशास्त्र, मंत्रशास्त्र, रत्नशास्त्र यांचे जाणकार व मार्गदर्शक.
पत्ता : श्री हनुमान मंदिर, छावणी परिसर, छत्रपती संभाजीनगर-४३१ ००२ (महाराष्ट्र)
मो. ९४२३४५५४४९

श्री. श्रीकांत रामचंद्र देशमुख
मो. ९८२२०२९२८३
श्री. भागवत कडू पाटील
मो. ९८५०५००८५८
श्री. शैलेश बाबुराव काळंब
मो. ७३८५६७४६६४
श्री. परशुराम विठ्ठलराव कुंदे
मो. ७८७५४०१३०५

प्रमुख सल्लागार :
डॉ. शरद गंगाधर भोगले
सौ. स्मिता शरद भोगले

वितरण प्रमुख
सौ. वंदना रत्नाकर देशमुख
श्री. रत्नाकर बबनराव देशमुख
सौ. अनुश्री पियुष कोटेचा (देशमुख)
श्री. पियुष प्रकाश कोटेचा

कव्हर आणि सर्व रंगीत पृष्ठांची संकल्पना आणि संगणक ग्राफिक्स
श्री. अशोक अरविंदराव देशपांडे
श्री. श्रीनिवास केशवराव पहिनकर
श्री. ललित रोहिदास गांगवे

वितरण मूल्य : ₹ ३० फक्त

© BYK **योग आध्यात्मिक फोरम सर्वाधिकार सुरक्षित**

सूचना : या पुस्तकाचा कोणताही भाग प्रकाशकाच्या पूर्व परवानगीशिवाय इलेक्ट्रॉनिक, यांत्रिक, फोटोकॉपी, रेकॉर्डिंग पुनरुत्पादित किंवा कॉपी केला जाऊ नये. तसेच पुनर्प्राप्ती प्रणालीमध्ये संग्रहित किंवा कोणत्याही प्रकारे प्रसारित केला जाऊ नये. याचे उल्लंघन केल्यास योग्य ती कायदेशीर कारवाई केली जाईल.

# ।। राजयोग ।।

## भक्तियुक्त कर्मयोग

**२१ व्या शतकातील वैज्ञानिक काळात श्रीमद्भगवद्गीतेचे व्यावहारिक ज्ञान**

(वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक व राजनीतिक जीवनाचा यशोमार्ग)

**(सचित्र मराठी आवृत्ती–संपूर्ण)**

पुस्तकाची मांडणी व ५ भाग

द्वारा
श्रीकांत रामचंद्र देशमुख

BYK YOG
Bhaktiyuktã Karmã Yog
(भक्तियुक्त कर्मयोग आध्यात्मिक फोरमचा उपक्रम)

## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| **भाग ५ : उपसंहार व परिशिष्ट** | २२५ ते २७९ |
| **लेखकाचा परिचय** | २८० ते २८१ |
| BYK **आध्यात्मिक फोरमबद्दल माहिती** | २८२ ते २८३ |

# भाग ५ : उपसंहार व परिशिष्ट

सांसारिक जीवनात आध्यात्मिक ज्ञानाच्या संदर्भात वारंवार विचारले जाणारे काही महत्त्वपूर्ण प्रश्न व त्यांची थोडक्यात उत्तरे – बोध



दिव्य विनम्रतेतून आत्मनिवेदन भक्ती

**शरीररूपी आत्मा व शरीररूपी परमात्मा यांचा नैसर्गिक संबंध**

प्रत्येक व्यक्तीचा तिच्या स्वतःच्या आवडत्या इष्ट (आराध्य, उपास्य) देवतेशी असलेला नैसर्गिक संबंध.



मानवी शरीर म्हणजे दोन विपरीत स्वभावाच्या गुणांच्या सहअस्तित्वाने निर्माण झालेल्या अहंकाररूपी शक्तीचे स्थूल स्वरूप आहे.

## भाग ५
## उपसंहार व परिशिष्ट


| अनुक्रमांक | विषय – सूची | पृष्ठ संख्या |
|---|---|---|
| ❖ | **उपसंहार –** सांसारिक जीवनातील आध्यात्मिक सत्यता | २२७–२४६ |
| ❖ | **परिशिष्ट –** सांसारिक जीवनातील आध्यात्मिक ज्ञानाच्या संदर्भातील प्रश्न व उत्तरे | २४७–२८० |


-------o◯o-------

# उपसंहार

## ✻ सांसारिक जीवनातील आध्यात्मिक सत्यता ✻

या प्रकरणात भक्तियुक्त कर्मयोग साधकांच्या जीवनातील चढउतार, सुखदुःख, यश-अपयश यांचे विवेचन केले आहे व अशा सर्व साधकांना ईश्वर त्यांच्या किंवा तिच्या इष्ट (आराध्य, उपास्य) देवतांच्या स्वरूपात सांसारिक जीवनात सुख, यश, समृद्धी प्राप्त होण्यासाठी कशी मदत करतात हे स्पष्ट केले आहे. जगातील प्रत्येक व्यक्तीला स्वतःचा असा विशिष्ट स्वधर्म (जबाबदारी), त्यानुसार येणारे कर्तव्यकर्म, स्वतःचा अहंकार, नैसर्गिक असा सेवाभाव, स्वतःची श्रध्दा व विश्वासानुसार इष्ट (उपास्य, आराध्य) देवता असते. भक्तियुक्त कर्मयोग साधना केवळ या ५ गोष्टींवर अवलंबून आहे. सांसारिक जीवनात प्रत्येक व्यक्तीला या पाचही गोष्टी आपोआप मिळत असतात.

त्यामुळे या प्रकरणातील विवेचन जगातील विविध क्षेत्रात, विविध स्तरांवर कार्यरत असलेले स्त्री-पुरुष, तरुण, ज्येष्ठ अशा सर्वांनाच सारखेच उपयोगाचे आहे. राजयोग साधना उद्योजक, शेतकरी बंधू, व्यापारी, सामाजिक व राजनीती क्षेत्रात कार्यरत व्यक्ती, कामगार बंधू, नोकरवर्ग तसेच सर्व जाती-जमातीतील सर्व वयोगटातील स्त्री-पुरुष व आध्यात्मिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या व्यक्ती अशा सर्व लोकांसाठी सारखीच प्रभावशाली व यश देणारी आहे.

या पुस्तकात अर्जुन, पांडव व त्यांची राणी, छत्रपती श्री शिवाजी महाराज व भारताचे पंतप्रधान, माननीय श्री. मोदी साहेब यांची भक्तियुक्त कर्मयोग

साधनेचे सांसारिक जीवनातील रोल मॉडेल्स म्हणून उदाहरणे घेतली आहेत. वाचकांनी व साधकांनी त्याचा कोणत्याही एका राजनीतिक पक्षाशी किंवा धर्माशी संबंध जोडू नये. तसा उद्देश पण नाही. सर्वसामान्य सांसारिक लोकांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने रोल मॉडेल्स दर्शविल्याने विषय समजणे सोपे होते म्हणून तसे केले आहे.

कोणत्याही विचारसरणीशी बांधिलकी मानणारे, कोणत्याही राजनीतिक पक्षाशी जोडलेले किंवा तटस्थ जीवन जगणारे, तटस्थ सेवाभावी संस्थांमध्ये कार्यरत, पत्रकार, मीडिया हाऊसेसमध्ये कार्यरत लोक जे वैयक्तिक, पारिवारिक व सामाजिक आयुष्यात सुख, यश, उत्तरोत्तर प्रगतीची इच्छा ठेवतात; त्यांना या प्रकरणातील विवेचन दिशादर्शक राहील.

**प्रश्न** : भक्तियुक्त कर्मयोगी कसे काम करतात? त्यांची काम करण्याची पद्धत कशी असते?

**बोध** : **१.** भक्तियुक्त कर्मयोगी साधकाने त्याचे मन, बुद्धी व चित्त ईश्वराशी लिंक केलेली असतात. मानवी जीवनात शरीर व इंद्रिये नेहमी मन व बुद्धीच्या साहाय्यानेच कर्म करत असतात; त्यामुळे अशा योगी व्यक्तीला ईश्वराचे मन व ईश्वराच्या बुद्धीचे पाठबळ मिळत राहते. त्यामुळे अशा व्यक्तीस जीवनात वेळ व काळानुरूप एक विशिष्ट उद्देश प्राप्त होत राहतो व भक्तियुक्त कर्मयोगी त्या आधारावरच दैनंदिन जीवनातील कर्मे करण्याला प्राधान्य देतो.

**बोध** : **२.** या भौतिक जगात कर्म करण्यासाठी हीच पद्धत ईश्वराने मानवासाठी निश्चित केलेली असल्या कारणाने अशा व्यक्तीस ईश्वराचा त्याच्या इष्ट, उपास्य किंवा आराध्य देवतेच्या स्वरूपात आवश्यकतेनुसार वेळ व काळानुरूप नैसर्गिकरीत्या ज्याप्रमाणे आई-वडिलांचे आपल्या अपत्याला न मागता साहाय्य मिळत राहते, तसेच साहाय्य पण मिळत राहते. त्यामुळे अशा योगी व्यक्तीच्या जीवनातून स्वतःसाठी काही वेगळे असे मिळविण्याची लालसा निघून जाते. भक्तियुक्त कर्मयोग साधकास याचा उपयोग असा असतो की, या आव्हानात्मक सांसारिक आयुष्यात कर्तव्यकर्मे करण्यासाठी आवश्यक असलेल्या आत्मविश्वासाची त्यांना कमी पडत नाही.

**बोध : ३.** भक्तियुक्त कर्मयोगी साधकांस ईश्वर विषयक विधायक उकल (प्रोग्रेसिव्ह अनफोल्डिंग) करून देणारे तत्वज्ञान चांगलेच माहीत असते. त्यामुळे भक्तियुक्त कर्मयोगी भविष्यात घडणाऱ्या गोष्टींबद्दल आवश्यक तेवढेच बोलतात. एकही जास्त वाक्य बोलत नाहीत. त्यांचे मन हे ईश्वराशी लिंक असल्यामुळे त्यांना हे शक्यही होते. माननीय श्री. मोदीजींच्या हस्ते अयोध्येत प्रभू श्रीरामललाची स्थापना होईपर्यंत त्यांनी या गोष्टीचे पालन केलेले दिसते. त्यांच्या जीवनाचा हा स्थायीभाव राहिलेला आहे. अर्जुन, पांडव व त्यांची राणी यांचा पण राजसूय यज्ञात भगवान श्रीकृष्णांची अग्रपूजा करेपर्यंत हाच स्थायीभाव राहिला होता.

**बोध : ४.** भक्तियुक्त कर्मयोगी हे जाणतो की, त्याच्याकडे येणारी सत्ता, अधिकार, पैसा, संपती व ज्ञान हे ईश्वराच्या योजनेचाच एक भाग आहे व त्यामुळे अशा सर्व गोष्टी असा योगी ईश्वराच्याच मार्गदर्शनाखाली सेवाभावनेतून वापरत असतो. त्याच्या स्वतःच्या व्यक्तिमत्त्वात या बाबतीत भ्रष्टता नसते व त्याच्या अधिकार क्षेत्रात येणाऱ्या भ्रष्ट व्यक्तींना शिक्षा देण्यास त्याला संकोच पण नसतो व आनंद पण नसतो. कारण ईश्वराच्या प्रती ते त्याचे कर्तव्यच असते.

**बोध : ५.** भक्तियुक्त कर्मयोग साधकांना या जगातून किंवा इतरांकडून स्वतःसाठी वेगळे असे काहीच मिळवावयाचे नसते, त्यामुळे त्यांना कधीच अधिक बोलण्याची गरज नसते.

**प्रश्न** : भक्तियुक्त कर्मयोग्याकडून चुका होत नाहीत का ?

**बोध** : या भौतिक जगाची रचनाच अशी आहे की, कोणत्याही व्यक्तीस स्त्री असो किंवा पुरुष असो केवळ आत्म्याच्या शक्तीने अहंकाराच्या शक्तीवर नियंत्रण ठेवणे शक्य नसते.

सांसारिक जीवनात मी म्हणजे योगी (मी म्हणजे आत्मा) या भावनेत कर्म केल्यास चुका घडत नाहीत व यश मिळत राहते. परंतु विरोधाभास (पॅराडॉक्स) असा असतो की, मिळालेल्या यशातून निर्माण झालेल्या कर्तृत्वाचे स्वरूप भौतिक अर्थात दृष्यरूप असल्यामुळे असे यश, कर्तृत्व, ''मी (इगो)'' शी एकरूप होते त्यातून माझे कर्तृत्व, माझे यश व माझे ज्ञान असा भाव व्यापार सुरू होतो. या सर्व भावनांमधून व्यक्ती मी म्हणजे माझा अहंकार या भावनेच्या अंतर्गत कर्म करू

लागते. इथंच व्यक्तीकडून गफलत होते. या अहंकाराच्या भावनेत व्यक्ती मी म्हणजे माझे कर्तृत्व, मी म्हणजे माझे यश अशा मानसिक अवस्थेत कर्म करू लागते.

सत्य असे आहे की, अहंकाराची शक्ती ही मुळातच विपरीत स्वभावाची असल्यामुळे बेभरवशाची असते व त्यामुळेच चूक घडते. कर्म करताना ज्या प्रमाणात मी म्हणजे माझे कर्तृत्व ही मानसिकता प्रबळ असते त्या प्रमाणात चुका किंवा घोडचूक सुद्धा घडते.

अहंकार हा या सांसारिक जीवनाचा एक मूलभूत भाग असल्यामुळे भक्तियुक्त कर्मयोग्यांकडून व भक्तियुक्त कर्मयोग साधकांकडून सुद्धा अशा गोष्टी होतात व चुका होतात.

**प्रश्न :** भक्तियुक्त कर्मयोग्यांकडून चूक झाल्यास ईश्वर काय करतात? त्यांच्या झालेल्या चुकांमधून त्यांना परत मोठ्या सफलता प्राप्त करण्यासाठी कसे साहाय्य करतात? ईश्वराची अशा योग्याशी वागणूक कशी असते?

**बोध :** ईश्वराने या भौतिक जगासाठी निश्चित केलेल्या कर्मसिद्धांतानुसार कर्मफळे येतातच. त्यामुळे भक्तियुक्त कर्मयोग साधकांकडून चूक झाल्यास येणाऱ्या वाईट कर्मफळ किंवा परिणामांतून त्यांनाही सूट नसते. ती फळे किंवा परिणामांना त्यांनाही तोंड द्यावेच लागते. ईश्वर त्यामध्ये हस्तक्षेप करत नाही. परंतु भक्तियुक्त कर्मयोग साधकाकडून मोठी चूक होत असताना व चूक झाल्यावर येणारी कर्मफळे किंवा येणाऱ्या परिणामांचे ज्ञान ईश्वराला असल्यामुळे ईश्वर साधकाच्या भक्तियुक्त कर्मयोग साधनेत खंड पडू नये, म्हणून काही योजना तयार ठेवतात. व येणाऱ्या अपयशातून परत मोठी सफलता प्राप्त करण्यासाठी उपयोगी असे ज्ञान देऊन साधकाला साधकाची कर्म करण्यासाठीची अंतर्गत भावना मी कोण? तर मी म्हणजे योगी या भावनेत स्थिर होण्यास मदत करतात.

यामुळे साधकात त्याच्या झालेल्या चुकांमधून नवीन जाणीव जागृत होते व त्यानुसार तो जास्त शुद्ध कर्मे करू लागतो. व झालेल्या चुकांतून त्याला नवीन अंतर्दृष्टी मिळते. याप्रकारे चुकांची जाणीव झाल्यामुळे भक्तियुक्त कर्मयोग साधना जास्त प्रखर करण्यास व्यक्तीस बळच मिळते. त्यांच्या उन्नतीचा हाच खरा मार्ग आहे.

**प्रश्न** : भक्तियुक्त कर्मयोग साधकाकडून मोठी चूक होत असताना व चूक झाल्यावर येणाऱ्या कर्मफळांचा किंवा येणाऱ्या परिणामांचाच उपयोग करण्याचे साधकाला ज्ञान देऊन ईश्वर त्याला कसे परत त्याच्या मी कोण? तर मी म्हणजे योगी या भावनेत स्थिर होण्यास मदत करतात?

या पुस्तकात १) अर्जुन, पांडव व त्यांची राणी, २) श्री छत्रपती शिवाजी महाराज, ३) भारताचे पंतप्रधान माननीय श्री. नरेंद्र मोदीजी हे भक्तियुक्त कर्मयोग साधनेत श्रेष्ठता मिळविलेले ३ रोल मॉडेल्स म्हणून दर्शविलेले आहेत. त्यांच्या केस स्टडीज्मधून सर्व स्तरांवर कार्यरत असलेल्या योग साधकांस भक्तियुक्त कर्मयोगी साधनेची कार्यपद्धती समजून घेता येते.

**उदाहरण १) अर्जुन, इतर पांडव व त्यांची राणी या विषयी विवेचन**

अर्जुन, इतर पांडव व त्यांची राणी, हे सर्व भक्तियुक्त कर्मयोगी म्हणून आयुष्य जगत होते. भगवान श्रीकृष्ण त्या सर्वांचे इष्ट दैवत होते. अर्जुन व इतर सर्व पांडव लहानपणापासूनच भक्तियुक्त कर्मयोग साधनेचे सूत्र जगत होते व त्यामुळेच त्यांना सर्व संकटांत ईश्वराचे साहाय्य मिळत आलेले होते. भगवान श्रीकृष्णांच्या संपर्कात आल्यानंतर त्यांच्यात ईश्वराच्या योजनेप्रमाणे राजयोग सूत्रातील इष्टदेवतेची जाणीव पण जागृत झालेली होती व त्यांना श्रीकृष्ण हेच आपले इष्ट, उपास्य, आराध्य दैवत आहे याची अनुभूती आली होती व खात्री पण झाली होती.

भक्तियुक्त कर्मयोग साधनेचा प्रभाव इतका श्रेष्ठ आहे की, रानावनात भिक्षा मागत लपूनछपून आपले आयुष्य जगणारे पांडव चक्रवर्ती सम्राट म्हणून नावारूपास आले. तो त्यांच्या आयुष्यात त्यांच्या भक्तियुक्त कर्मयोग साधनेमुळे आलेला अत्युच्च काळ होता. भगवान श्रीकृष्णांच्या भौतिक स्वरूपात त्यांना साथ देणाऱ्या ईश्वराने राजसूय यज्ञात पांडव व त्यांच्या राणीकडून स्वतःची पूजा करून घेण्याची संधी पण त्यांना दिली होती.

परंतु, भगवान श्रीकृष्णांना हे माहीत होते की, पांडव व त्यांची राणी यांची भक्तियुक्त कर्मयोग साधना अजून पूर्ण झालेली नाही व त्यांच्या स्वतःच्या जीवनाच्या भौतिक व आध्यात्मिक विकासासाठी तसेच राष्ट्राच्या पुढील उन्नतीच्या दृष्टीने पांडवांना त्यांच्या मर्यादा लक्षात येणे व त्या मर्यादेची त्यांना जाणीव होणे महत्त्वाचे होते. त्यामुळे राजसूय यज्ञाचे समापन झाल्यावर पांडव व

त्यांच्या राणीला चक्रवर्ती सम्राट म्हणून स्थिर केल्यावर तसेच त्यांचे सर्व शत्रू क्षीण केल्यावर भगवान श्रीकृष्णांनी त्यांच्यावरील नियंत्रण थोडे शिथिल केले.

''अशा परिस्थितीत या जगाच्या नैसर्गिक कार्यपद्धतीप्रमाणे भक्तियुक्त कर्मयोग साधकांकडून जी चूक होते तीच गोष्ट पांडवांच्या बाबतीत पण झाली''.

सामान्य जीवन ते चक्रवर्ती सम्राट असे अफाट कर्तृत्व, अफाट सामर्थ्य, सत्ता, ऐश्वर्य प्राप्त झाल्यामुळे साधक म्हणून त्यांची त्यांचे इष्ट दैवत भगवान श्रीकृष्णांशी असलेली कनेक्टिव्हिटी क्षीण झाली. त्यामुळे साधकांसाठी आवश्यक अशी : मी कोण? तर मी म्हणजे योगी या भावनेतून ते सर्व मी कोण? तर मी म्हणजे माझा अहंकार, मी म्हणजे माझे कर्तृत्व अशा भावनेत गेले. ते कसे झाले हे त्यांचे त्यांनाच कळले नाही व काही काळासाठी ते त्यांच्या मी कोण? तर मी म्हणजे माझा अहंकार, मी म्हणजे माझे कर्तृत्व या भावनेत स्थिर झाले. ईश्वराने ते होऊ दिले.

**बोध** : या भौतिक जगाचा मुख्य आधार असलेली व तिच्या निर्मितीचा अविभाज्य घटक असलेली दोन विपरीत गुणांनी बनलेली अहंकाररूपी शक्ती इतकी बलाढ्य आहे की, अर्जुन व इतर पांडवांसारखे श्रेष्ठ भक्तियुक्त कर्मयोगी सुद्धा चूक करू शकतात व काही काळासाठी योगभ्रष्ट अवस्थेत जाऊ शकतात.

व्यक्तीकडून चुका होणे ही या सांसारिक आयुष्याची नैसर्गिकता आहे. म्हणूनच भगवद्गीतेत भगवान श्रीकृष्णांनी प्रत्येक व्यक्तीने दैनंदिन आयुष्यात योगयुक्त राहण्याच्या अभ्यासावर भर देण्याची आवश्यकता प्रतिपादित केलेली आहे. व म्हणूनच प्रत्येक व्यक्तीला ईश्वर स्वतः त्याच्या किंवा तिच्या इष्ट (उपास्य/आराध्य) देवतेच्या स्वरूपात जन्मापासून मृत्यूपर्यंत साथ करतात. म्हणूनच श्रीकृष्णांनी अर्जुनाला भक्तियुक्त कर्मयोगी हो असे सांगितले आहे.

पांडवांनी अहंकाररूपी शक्तीच्याच प्रभावात येऊन आपल्या भक्तियुक्त कर्मयोग साधनेत दुर्लक्ष केले. आपल्या इष्ट देवतेशी म्हणजेच भगवान श्रीकृष्णांशी विचारविनिमय न करता त्यांच्याशी कोणत्याही प्रकारे संपर्क न साधता कौरवांचे द्यूत खेळण्याचे निमंत्रण स्वीकारले व सर्व सत्ता, ऐश्वर्य, मानमर्यादा वगैरे वगैरे घालवून बसले. द्यूत खेळणे हा काही त्यांचा स्वधर्म नव्हता व कर्तव्यकर्म पण नव्हते व ते द्यूत आमंत्रण त्यांनी श्रीकृष्णांची इच्छा म्हणून किंवा श्रीकृष्णांसाठी

म्हणून पण स्वीकारले नव्हते. ती चूकच होती. साहजिकच ईश्वराने ते घडू दिले. कारण की तसे होऊ दिले नसते तर पांडवांना त्यांची मानसिक पातळीवर होत असलेली चूक कळलीच नसती, त्यांचा मी कोण? तर मी म्हणजे माझे कर्तृत्व असा अहंकार अजून वाढतच गेला असता.

लक्षात घेण्याची गोष्ट आहे की, पांडवांकडून ती चूक होत होती. परंतु मुळात ते उच्च पातळीवरील भक्तियुक्त कर्मयोगीच होते. त्यामुळे त्यांना वाचविणे भगवान श्रीकृष्णांना त्यांचे इष्ट दैवत म्हणून भागच होते. त्यासाठी भगवंताने योग्य ती तजवीज करून ठेवली होती.

**प्रश्न** : भक्तियुक्त कर्मयोग साधकांकडून मोठी चूक झाल्यावर त्यांना भोगावी लागणारी कठीण कर्मफळे किंवा येणाऱ्या वाईट परिणामांचाच उपयोग करण्याचे ज्ञान देऊन ईश्वर त्यांना कसे परत त्यांच्या मी कोण? तर मी म्हणजे योगी या भावनेत स्थिर होण्यास मदत करतात?

**बोध** : श्रीमद्‌भगवद्‌गीतेत भगवान श्रीकृष्णांनी स्पष्ट केले आहे की, ईश्वर कोणाशीही पक्षपात करत नाही. त्यामुळे जरी पांडव व त्यांची राणी भक्तियुक्त कर्मयोगी होते व त्यांचे इष्ट दैवत असलेल्या श्रीकृष्णांशी समर्पित होते, तरीपण त्यांच्या मोहात न पडता श्रीकृष्णांनी त्यांच्या १३ वर्षांच्या वनवासात हस्तक्षेप केला नाही. उलटपक्षी ती शिक्षा त्यांना भोगण्याची आवश्यकता सांगितली. ती शिक्षा भोगण्यासाठी आवश्यक ते बळ दिले. त्यांना रागे भरून त्यांची चूक लक्षात पण आणून दिली व पुनश्च्य अशा चुका होऊ नये म्हणून वनवासाच्या कालावधीत त्या सर्वांकडून योग्य ती साधना करवून घेतली. त्यासाठी आवश्यक ते ज्ञान पण त्यांना दिले. त्या वनवासाच्या काळात त्यांची आवश्यक ती मदत केली व त्यांच्या अतिशय हीन व घातकी असलेल्या शत्रूंना शिक्षा करण्यास पात्र होण्याच्या दृष्टीने पांडवांत त्यांची शक्ती वाढविण्याच्या आवश्यकतेची जाणीव पण जागृत केली.



त्याचाच एक भाग म्हणून मुख्यतः अर्जुनाला भगवान श्री देवाधिदेव महादेवांना प्रसन्न करून स्वर्गातील सर्व देवतांकडून दिव्य शस्त्रास्त्रे प्राप्त करून घेण्यासाठीचे मार्गदर्शन केले. यात्रकारे ईश्वर प्रत्येक परिस्थितीत भक्तियुक्त कर्मयोग साधकांना मदत करतात त्यांची काळजी घेतात.

''त्या कालावधीमध्ये भगवान श्रीकृष्णांनी स्वतः पुढे भविष्यात कौरवांशी होणाऱ्या त्यांच्या युद्धाच्या दृष्टीने आवश्यक ती तयारी करून ठेवली. युद्धात अशक्यप्राय वाटणारा विजय पांडवांना मिळवून दिला. त्यासाठी स्वतः भगवान श्रीकृष्ण त्या भीषण महायुद्धात पांडवांच्या संरक्षणासाठी त्यांच्या बरोबर उभे राहिले. याप्रकारे पांडवांना पुनःश्च चक्रवर्ती सम्राट पदावर स्थिर केले व पुढील ३६ वर्षे त्यांच्याकडून भक्तियुक्त कर्मयोग साधनेची सामान्य जीवनात पृथ्वीवर स्थापना, शिकवण व तिचा प्रसार करवून घेतला. ती संधी त्याांना दिली. त्यानंतर जवळपास २५०० वर्षांपर्यंत सनातन धर्माची मूळ शिकवण म्हणजे भक्तियुक्त कर्मयोग साधना ही वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक व राष्ट्रीय जीवनाचा आधार म्हणून प्रेरणादायी होती''.

**बोध :** सत्य असे आहे की, भक्तियुक्त कर्मयोगी किंवा असा साधक सुद्धा चुकू शकतो व तो चुकतो सुद्धा. परंतु या सांसारिक जगातील सर्व भक्तियुक्त कर्मयोग साधक हे ईश्वराच्या क्रिएटिव्ह व्यक्तिमत्त्वाचे भाग असतात. त्यामुळे ईश्वर त्यांची साथ देतात व त्यांच्या चुकांतून त्यांना नवीन ज्ञान देऊन उच्च प्रगतीसाठी अग्रेसर करतात. पर्यायाने त्यांच्या स्वतःचे, त्यांच्या परिवाराचे, समाजाचे व राष्ट्राचे नियंत्रण पण त्यांच्याकडून करून घेतात. तशी संधी भक्तियुक्त कर्मयोग्यास प्राप्त होते. हीच खरी ईश्वराची या सांसारिक जीवनात होणारी कृपा आहे. हेच भक्तियुक्त कर्मयोग साधनेचे मर्म आहे.

**उदाहरण २) श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे बाबत विवेचन**
अलीकडच्या काळातील श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनात भक्तियुक्त कर्मयोग साधनेची परिपूर्तता दिसते. राजांना कधी अहंकाराची बाधा झाली नाही. त्यांना लहानपणापासूनच त्यांच्या जीवनातील ईश्वराचे स्थान पूर्णपणे समजले होते. हे त्यांच्या घोषवाक्यावरून लगेचच समजून येते.

राजे म्हणत : “ हे राज्य व्हावे, ही श्रींची इच्छा आहे, आम्ही निमित्तमात्र आहोत. या राज्यासाठी आम्ही फकिरी पत्करली आहे, जे आम्हास अनुकूल असतील त्यांनी आमच्या बरोवर राहावे, बाकीच्यांनी निघोनि जावे.” त्यांच्याकडून भक्तियुक्त कर्मयोग साधनेत कधी चूक झाली नाही. त्यामुळे अतिशय कमी वयात, त्यांना चिरकाल टिकेल असे यश प्राप्त झाले.



श्री छत्रपती आजही या सांसारिक जगातील सर्वश्रेष्ठ रणनीतीकार, राजर्षी व योगी पुरूष म्हणूनच ओळखले जातात व प्रत्येक भक्तियुक्त कर्मयोग्यांचे ते मुख्य प्रेरणास्थान आहेत. हे सर्वविदित आहे की, भारताचे यशस्वी पंतप्रधान माननीय श्री. नरेंद्र मोदी यांचे पण ते प्रेरणास्थान आहे.

श्री छत्रपती शिवाजी महाराजांमध्ये त्यांची आई जिजामाता यांच्या श्रेष्ठ संस्कारांमुळे लहानपणीच श्रीमद्‌भगवद्‌गीतेतील खालील श्लोकाचे पूर्ण रिअलायझेशन, आकलन व जाणीव जागृत झाली होती व त्यांच्या जीवनाच्या अंतिम क्षणापर्यंत ती जाणीव व ती भावना त्यांच्यात जागृत होती.

भगवद्‌गीता : अध्याय ११, श्लोक ३३ :

तस्मात्त्वमुत्तिष्ठ यशो लभस्व जित्वा शत्रून्भुक्ष्व राज्यं समृद्धम् ।
मयैवैते निहताः पूर्वमेव **निमित्तमात्रं भव सव्यसाचिन् ।।३३।।**

श्रीमद्‌भगवद्‌गीतेच्या अभ्यासकांसाठी व मुख्यतः जगातील विविध क्षेत्रात, विविध स्तरांवर कार्यरत सर्व भक्तियुक्त कर्मयोग साधकांसाठी या श्लोकाचा भावार्थ व बोध असा निघतो.

भगवान श्रीकृष्ण त्यांच्या विश्वरूप परमात्मा स्वरूपात अर्जुनाला स्पष्ट करतात की, या सांसारिक जगात मानवाने स्वधर्माप्रमाणे आपल्या वाट्यास आलेली आपली कर्तव्यकर्मे सेवाभावनेतून करत राहण्याचे संस्कार सर्व लोकांत व्हावेत व तशी व्यवस्था निर्माण करून ती स्थिर करण्यासाठी तू माझ्या व्यक्तिमत्त्वाचाच एक भाग म्हणून मी तुझी निवड केलेली आहे. तू माझा प्रिय भक्तियुक्त कर्मयोगी असल्याकारणाने या जगात तुझे यश, वैभव व गौरव वाढावा अशीच माझी इच्छा आहे.

जगाच्या कल्याणासाठी मी माझ्या विश्वरूप परमात्मा स्वरूपात निश्चित केलेली अशी ही भव्य योजना कोणत्याही प्रकारे कोणालाही टाळता येणार नाही. त्यामुळे या योजनेचा एक भाग म्हणून अर्जुनाने स्वतःचे कर्तव्य कर्म सेवाभावनेतून करत या योजनेचे फक्त एक साधन बनावे अशी त्यांची इच्छा आहे.

**अंतर्निहित बोध :** भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला स्पष्ट करतात की, त्यांच्या कृपेनेच अर्जुनाला त्याचा स्वधर्म व त्यानुसार धनुर्विद्येत विलक्षण कौशल्य प्राप्त झालेले आहे. ईश्वराच्या नियोजनाप्रमाणेच अर्जुनाच्या गुणांचा विकास झालेला आहे व त्याच्या स्वधर्मानुसार कर्तव्यकर्मे करण्यासाठी ईश्वराने त्याला सक्षम केलेले आहे. जन्मापासून अर्जुनाकडे वेळ व काळानुसार त्याच्या स्वधर्मात होणारे बदल त्यानुसार येणारी कर्तव्यकर्मे, येणारे ज्ञान, यश व कठीण परिस्थितीतही त्याला मिळत राहणारे संरक्षण हे सर्व तो करत असलेल्या भक्तियुक्त कर्मयोगसाधनेचे फळ आहे.

या पुस्तकात अर्जुनाला चक्र ६ व चक्र ७ प्रमाणे ईश्वराचे संरक्षण व आवश्यक असे ज्ञान कशाप्रकारे भक्तियुक्त कर्मयोग साधना केल्यामुळे मिळत आलेले होते हे स्पष्ट केलेले आहे.

भगवान श्रीकृष्ण म्हणतात की, तुझ्याद्वारे या जगातील सामान्य लोकांच्या सर्वांगीण विकासाच्या विरुद्ध असलेल्या नार्सिस्टिक लोकांना नियंत्रणात ठेवता येण्यासाठी, तसेच आवश्यकतेनुसार त्यांना शिक्षा करण्यासाठी तसेच आपल्या स्वधर्मानुसार कर्म करणाऱ्या क्रिएटिव्ह लोकांना जगता यावे हीच त्यांची इच्छा आहे. त्यासाठी क्रिएटिव्ह लोकांचे नार्सिस्टिक (स्वयंकेंद्रीत, स्वयंमुग्ध) लोकांवर नियंत्रण येणे म्हणजेच क्रिएटिव्ह (सृजनशील) लोकांचा नार्सिस्टिक लोकांवर

विजय होणे हे त्यांनी आधीच निश्चित केलेले आहे. जगाच्या कल्याणासाठी त्यांनी केलेली ही भव्य योजना कोणत्याही प्रकारे टाळता येणार नाही. त्यामुळे अर्जुनाने आपल्या व्यक्तिगत शारीरिक, मानसिक किंवा बुद्धीच्या पातळीवरील सुख-दुःखांचा, आवडीनिवडींचा विचार बाजूला ठेवून त्याच्या स्वधर्माने निश्चित झालेले त्याचे स्वतःचे कर्तव्यकर्म करत राहण्याचे ईश्वराचे फक्त एक साधन बनावे अशी त्यांची इच्छा आहे.

**बोध :** अर्जुन परमश्रेष्ठ भक्तियुक्त कर्मयोगी असल्यामुळे त्याच्या प्रेमाखातर या श्लोकाद्वारे ईश्वराने या जगातील सर्व भक्तियुक्त कर्मयोग साधकांना सुद्धा स्पष्टपणे सांगितले आहे की, विश्वरूप परमात्मा त्यांच्या इष्ट देवतेच्या स्वरूपात हीच जाणीव अशा साधकांत जागृत करत असतात.

**सूचना :** ईश्वराला त्यांच्या कामासाठी व्यक्तीकडून अशी मदत मिळावी असा अट्टहास नसतो. जगातील प्रत्येक व्यक्तीला दिलेल्या स्वतंत्रतेचा ते मान राखतात. परंतु, भक्तियुक्त कर्मयोग साधकाला ते विशिष्ट असे ज्ञान देतात व त्यामुळे अशा साधकाला ईश्वराची इच्छा पूर्ण करण्याच्या प्रयत्नात आपली कर्तव्यकर्मे करण्यात दररोज आनंद मिळतो. सुख लागते. ईश्वराच्या आनंदासाठी अशा काही संधी मिळाल्याने व त्यादृष्टीने व्यक्तीने आपली कर्तव्यकर्मे करण्याच्या नुसते प्रयत्नात असल्यास सुद्धा व्यक्तीला ईश्वराची विशेष कृपा प्राप्त होते व त्याच्यात सेवाभाव जागृत होतो आणि अशी व्यक्ती ईश्वराचे दैनंदिन सेवक बनण्यास पात्र बनते. हाच भक्तियुक्त कर्मयोग साधनेचा परमोच्च मानदंड आहे.

हेच जीवनाचे अंतिम ध्येय आहे व सांसारिक जीवनाच्या बद्दल बोलावयाचे झाल्यास सत्य असे आहे की, अशा साधकांना सांसारिक सुख, यश, सर्वांगीण विकास अशा गोष्टी वेळ, काळ व त्यांच्या गरजेनुसार सहजपणे मिळत राहतात. त्यांच्यासाठी स्पेशल म्हणून असे काही काम त्यांना करावे लागत नाही.

**उदाहरण ३) भारताचे पंतप्रधान, माननीय श्री. नरेंद्र मोदीसाहेब यांचे विषयी विवेचन** : लागोपाठ तिसऱ्यांदा भारताचे पंतप्रधान झालेले माननीय श्री. नरेंद्र मोदी साहेब ज्यांची जगातील श्रेष्ठ नेत्यांमध्ये गणना होते.

भारताचे यशस्वी पंतप्रधान, माननीय श्री. मोदी साहेबांची आध्यात्मिक ओळख म्हणजे ते ईश्वराचे भक्तियुक्त कर्मयोगी आहेत. त्यांचा एका सामान्य

कुटुंबात जन्म झालेला आहे व तेथूनच त्यांनी जीवनाचा प्रवास सुरू केलेला आहे. अर्जुनासारखेच योगयुक्त आयुष्य ते जगत आलेले आहेत व जगत आहेत. त्यांच्या जीवनाचे अवलोकन केल्यास, अभ्यास केल्यास समजते की, अनेक वर्षेपर्यंत त्यांनी भक्तियुक्त कर्मयोग साधनेत स्वतःचे जीवन व्यतीत केलेले आहे. त्यांच्या या साधनेचे फळ म्हणूनच ईश्वराने त्यांना या जगात पुन्हा भक्तियुक्त कर्मयोग साधनेची पुनर्जागृती करण्याची जबाबदारी दिली होती; ती त्यांनी खूप चांगल्या रीतीने पार पाडली. त्यामुळे ईश्वराच्या योजनेचाच एक भाग म्हणून एक दिवस अचानक २००१ मध्ये त्यांना भारतातील गुजरात प्रदेशाची मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी मिळाली व ईश्वराचे सेवक म्हणून भारतीय राजनीतीत त्यांचा थेट प्रवेश झाला. गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून देशाच्या एका प्रांताचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने ईश्वराच्या योजनेनुसार त्यांनी जबाबदारी (स्वधर्म) स्वीकारली व त्या दिवसापासून आपल्या स्वधर्मानुसार येणारी कर्तव्यकर्मे ईश्वराचे थेट सेवक म्हणून ते ईश्वराप्रती सेवाभावनेने करू लागले. या पुस्तकात स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांच्या ईश्वराशी एकरूपतेतून केलेल्या भक्तियुक्त कर्मयोग साधनेच्या प्रभावामुळे त्यांची उत्तरोत्तर प्रगती होत गेली. गुजरात प्रांताचा विकास झाला व पर्यायाने भारताच्या विकासात पण त्यांचे योगदान स्पष्ट दिसू लागले.

❖ मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी पार पाडत असताना त्यांना अनेक प्रकारच्या अडचणींचा सामना करावा लागला. अतिशय हीन भावनेने वागणाऱ्या शत्रूंचे नियंत्रण त्यांना स्वतःचा संयम राखून करावे लागले. हे करत असताना स्वतःचे, आपल्या सहकाऱ्यांचे रक्षण करत गुजरात प्रांताचा विकास करण्याचा व सामान्य लोकांचे जीवनमान उंचावण्याचे ध्येय पण त्यांना गाठावयाचे होते. त्यात त्यांना ईश्वराचे सर्व प्रकारचे चक्र ६ व चक्र ७ मध्ये दर्शविल्याप्रमाणे वेळ, काळ व त्यांच्या आवश्यकतेनुसार साहाय्य मिळत होते.

❖ मुख्यमंत्री म्हणून श्री. मोदी साहेबांचे काम एवढे श्रेष्ठ होते की, ईश्वराच्या योजनेनुसार त्यांना भारताच्या सर्वांगीण विकासासाठी व सनातन धर्माची मूळ शिकवण या जगात पुनर्जीवित व्हावी यासाठी २०१४ मध्ये देशाच्या पंतप्रधानपदाची पूर्वीपेक्षा जास्त मोठी जबाबदारी मिळाली व त्यानुसार त्यांच्यात योग्य तो स्वधर्म जागृत झाला व त्यानुसार कर्तव्यकर्मे पण मिळाली.

हा सांसारिक जीवन जगणाऱ्यांसाठी ईश्वराचा साक्षात्कारच नाही का? देशातील प्रजा अनेक शतके परकीय शासकांच्या आधिपत्यात गुलामीत राहिल्यामुळे भारतात सर्व सनातनी समाज वेगवेगळ्या जाती, जमाती, पंथ, धर्मांमध्ये विखुरला गेला आहे. अशाप्रकारे विखुरलेल्या समाजाला एका सूत्रात संघटित करणे अतिशय कठीण आहे. ईश्वराच्या पाठबळाशिवाय ते शक्यही नाही. २०१४ पर्यंत सत्ताधारी या गोष्टीचा पूर्ण उपयोग करून सत्ता मिळवीत आलेले होते. अशा परिस्थितीत श्री. मोदी साहेबांना २०१४ मध्ये पूर्ण ताकदीचे अशक्यप्राय वाटणारे भारताचे पंतप्रधान पद मिळाले. ही त्यांच्यावरील ईश्वराच्या विश्वासाची एक मुख्य पावती आहे.

**बोध** : सत्य असे आहे की, सनातन धर्माची मूळ शिकवण म्हणजेच भक्तियुक्त कर्मयोग साधनेचे सूत्र देशात सर्व स्तरांवर कार्यरत प्रजेत संस्कारित होईपर्यंत भारतात विखुरलेपणा राहीलच.

अशाप्रकारे अतिशय कठीण परिस्थितीत, अनेक विरोधक, मीडिया हाउसेस व पत्रकार त्यांचा मत्सर करत असताना ईश्वराच्या योजनेप्रमाणे २०१४ मध्ये श्री. मोदीजींना पंतप्रधानपद प्राप्त झाले. देशाच्या पंतप्रधान पदाची जबाबदारी घेतल्यानंतर त्यांनी आपल्या भक्तियुक्त कर्मयोग साधनेत जास्त प्राविण्य मिळविले व ईश्वराने त्याची पोच म्हणून त्यांना २०१९ मध्ये मोठा जनादेश मिळाला.

**बोध** : माननीय श्री. मोदी साहेबांची गुजरात प्रांताचे २००१ मध्ये मुख्यमंत्री बनण्यापासून ते अयोध्येत २२ जानेवारी २०२४ या दिवशी प्रभू श्रीरामललाची त्यांच्या हाताने झालेली प्राणप्रतिष्ठा यावेळेपर्यंतच्या त्यांच्या सांसारिक जीवनाचे अवलोकन केल्यास सहज लक्षात येते की, ते एक महान व श्रेष्ठ भक्तियुक्त कर्मयोगी आहेत व त्यांचे सर्व जीवनच ईश्वराला समर्पित आहे. २००१ मध्ये गुजरातच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ ते २२ जानेवारी २०२४ पर्यंतच्या मागील २२-२३ वर्षांच्या काळांत त्यांच्या योगयुक्त अवस्थेत कोणतेही डेव्हिएशन आलेले आढळत नाही व त्यांच्या उत्तरोत्तर प्रगतीत वाढ होतानाच दिसत आलेली आहे. त्यांच्याशी शत्रुत्व ठेवणारे पण क्षीण राहिले. या वेळेपर्यंत त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वेगवेगळे पैलू जगाला स्पष्ट झालेले दिसतात.

अर्जुन व पांडवांचा त्यांच्या योगयुक्त कर्मांमुळे सामान्य जीवन ते चक्रवर्ती सम्राट पदापर्यंतचा प्रवास जसा झाला; तसाच श्री. मोदीजींचा पण असा हा विलोभनीय व मन अचंबित करणारा प्रवास आहे. हे सर्व त्यांच्या भक्तियुक्त कर्मयोग साधनेतून मिळणाऱ्या फळाचे किंवा परिणामांचेच प्रात्यक्षिक आहे. ही गोष्ट भक्तियुक्त कर्मयोग साधकांसाठी या पुस्तकात चक्र ६ व चक्र ७ द्वारे स्पष्ट केल्याप्रमाणे ईश्वराची वचनबद्धता पण दर्शविते.

वरील सर्व गोष्टींची संगतवार मांडणी केल्यावर लक्षात येते की, या वेळेसच्या भारताच्या २०२४ च्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये त्यांना अनपेक्षितरित्या काहीसे अपयश मिळाले. अर्थात ईश्वराचीच ती योजना आहे. श्री. मोदीजी अर्जुनासारखेच ईश्वराचे आवडते व श्रेष्ठ भक्तियुक्त कर्मयोगी असल्यामुळे विनाकारण ईश्वराने ते घडवून आणलेले नाही.

''त्यांच्या बाबतीत असे का झाले याचे विवेचन केल्यास जगातील सर्वच भक्तियुकत कर्मयोग साधकांशी ईश्वराचे कसे नाते असते त्याबद्दल काही महत्त्वाच्या गोष्टी स्पष्ट होतात. ते समजून घेतल्यास सांसारिक जीवनात कार्यरत सर्वस्तरांवरील लोकांना भक्तियुक्त कर्मयोग साधनेची पूर्तता समजून येण्यास उपयोगी होईल, साधकांना दिशादर्शक होईल व या साधनेवर लोकांची श्रद्धा व विश्वास दृढ होण्यास सहायकच ठरेल असे लेखकाचे मत आहे''.

❖ गुजरातचे मुख्यमंत्री झाल्यापासून १२ वर्षांच्या त्यांच्या कार्यकाळात व भारताचे पंतप्रधान पदाची जबाबदारी घेतल्यापासून मागील १० वर्षांच्या म्हणजे एकदंरीत त्यांच्या मागील २२-२३ वर्षांच्या मोठ्या कार्यकाळात त्यांच्या हाताने अयोध्येत प्रभू श्रीरामललाची स्थापना होईपर्यंतचे माननीय पंतप्रधान श्री. मोदी साहेबांचे कर्तृत्व त्यांनी केलेल्या भक्तियुक्त कर्मयोग साधनेच्या प्रभावाचा एक भाग आहे. त्यांच्या अथक परिश्रमांतून, सतत योगयुक्त अवस्थेत आपली कर्तव्यकर्मे केल्यामुळे माननीय श्री. मोदीजींना ईश्वराच्या योगदानातून ते यश मिळाले होते. हे सर्व त्यांना चांगलेच अवगत होते.

पांडवांनी संपन्न केलेल्या राजसूय यज्ञात ईश्वराने जसा भगवान श्रीकृष्णांच्या रूपात पांडवांना साक्षात ईश्वराची पूजा करण्याची संधी व मान दिला अगदी तसेच ईश्वराने श्री प्रभूरामलला विग्रहाची स्थापना करण्याची संधी व मान

माननीय पंतप्रधान श्री. मोदी साहेबांना दिला. हे त्यांच्या जीवनातील अत्युच्च कार्य आहे. व ईश्वराने त्यांना दिलेला सर्वोच्च मान पण आहे.

राजसूय यज्ञ पार पडल्यावर ईश्वराने त्यांचे श्रेष्ठ भक्तियुक्त कर्मयोगी असलेल्या पांडवांवरील नियंत्रण थोडे सैल केले तसेच प्रभू श्रीरामललाची अयोध्येत स्थापना झाल्यावर माननीय श्री. मोदी साहेबांवरील नियंत्रण पण सैल केले होते असे दिसते. त्याचा प्रभाव असा झाला की, आपल्या साधनेतून निर्माण झालेल्या आत्मविश्वासाच्या बळावर आलेल्या कर्तृत्वाच्या आडमध्ये पांडवांप्रमाणेच माननीय श्री. मोदीजींमध्ये सुद्धा काही काळ मी कोण? तर मी म्हणजे ईश्वराचा श्रेष्ठ भक्तियुक्त कर्मयोगी, मी म्हणजे माझे कर्तृत्व! मी म्हणजे माझी इतक्या वर्षांची आध्यात्मिक साधना, तपश्चर्या अशी अहंकाराची भावना स्थिर झाली.

**मग कसे चुकले ?**

१. यावेळी कारण नसताना श्री. मोदीजींनी २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत 'अब की बार ४०० पार' चा नारा दिला व त्यामुळे विनाकारण इतर जाती-धर्माच्या लोकांमध्ये असुरक्षिततेची भावना जागृत झाली. त्यांच्याच मागील २२-२३ वर्षांच्या त्यांच्या साधनेच्या मूळ तत्त्वाचे त्यांनाच विस्मरण झाले.

मुख्य म्हणजे ईश्वराला त्यांच्या यशासाठी आवश्यक वाटले तेव्हा २०१४ व २०१९ लोकसभेच्या निवडणुकीत त्यांना भक्कम असा जनादेश मिळला होता. यावेळी २०२४ मध्ये लोकसभेत ४०० जागांची गरज असल्यास ईश्वराने ते पण घडवून आणले असतेच.

२. कारण नसताना श्री. मोदीजींनी मीडियाला व पत्रकारांना अनेक मुलाखती दिल्यात व आपल्या बहुमताबद्दल वाजवीपेक्षा जास्त आत्मविश्वास दाखविला. त्यांच्याकडून विनाकारण भविष्य बोलण्याचा व मीडियाबरोबर बुद्धीविलास करत बसण्याचा प्रमाद घडला. त्यांना बोधावर आणण्यासाठी ईश्वराची ती योजनाच होती.

मुख्य म्हणजे हे सर्वविदित आहे की, मागील २२-२३ वर्षांतील त्यांच्या कार्यकाळात त्यांनी बिलकुल याच्या विपरीत धोरण ठेवले होते.

**बोध :–** मुख्य लक्षात घेण्याची गोष्ट अशी आहे की, श्री. मोदीजींना ईश्वराचे प्रोग्रेसिव्ह अनफोल्डिंग चे तत्वज्ञान चांगलेच माहीत आहे. त्यांना याची पूर्ण माहिती व ज्ञान आहे की, भक्तियुक्त कर्मयोगी भविष्यात घडणाऱ्या गोष्टींबद्दल आवश्यक तेवढेच बोलतात. एकही जास्त वाक्य बोलत नाहीत हे त्यांना चांगलेच अवगत होते. अयोध्येत भारताचे पंतप्रधान, माननीय श्री. नरेंद्र मोदीजींच्या हस्ते प्रभू श्रीरामललाची स्थापना होईपर्यंत त्यांनी या गोष्टीचे पालन पण केलेले होते. पण निवडणुकीच्या काळात त्यांना त्यांचा विसर पडला होता.

भगवद्‌गीतेच्या भाषेत याला योगभ्रष्ट अवस्था असे म्हणतात व अशी गोष्ट सांसारिक जीवनात सर्वच भक्तियुक्त कर्मयोग साधकांच्या बाबतीत घडत असते, पण ईश्वर त्यांना त्यातून आवश्यक ती जाण देऊन परत पुढे अग्रेसर करतात.

❖ हे सत्य समजून घेतले पाहिजे की, वाराणशीत भगवान महादेवांच्या राज्यात माता गंगेच्या उपस्थितीत श्री. मोदीजींचे जन–मतांचे मार्जिन जे २०१९च्या वेळेपेक्षा या वेळेस २०२४ मध्ये बरेच कमी झाले आहे.

❖ पाचशे वर्षांच्या सामूहिक तपस्येतून अयोध्येत प्रभू श्रीरामलला मंदिर बनून श्री. मोदीजींच्या हाताने ईश्वराने स्वतःची प्राणप्रतिष्ठा व स्थापना करून घेण्याचा त्यांना मान दिला; परंतु त्यानंतर अयोध्येतच सार्वत्रिक निवडणुकीत अपयश दिले.

**असे का झाले ?**

❖ भक्तियुक्त कर्मयोग साधकांनी लक्षात घ्यावे की, प्रभू श्रीरामललाच्या प्रतिष्ठापनेनंतर श्री. मोदीजींना आलेल्या आध्यात्मिक ग्लानीमुळे त्यांच्याकडून निवडणुकीच्या काळात अनवधानाने काही प्रमाणात योगयुक्त अवस्थेत कर्म झाले नाही व त्यामुळे काही चुका झाल्या.



अशा परिस्थितीत ईश्वराने त्यांना त्यांच्या आध्यात्मिक ग्लानीमधून जागे करण्यासाठी अयोध्येतच निवडणुकीत हार दिली व वाराणशीत सुद्धा त्यांचे मताधिक्य कमी करून त्यांना सिग्नल दिला. परंतु आपल्या भक्तियुक्त कर्मयोग्याचा उत्साह टिकून राहावा म्हणून निवडणुकीत त्यांना ओडिशा प्रांतात अभुतपूर्व असे यश पण दिले.

❖ हे देखील समजून घेणे महत्त्वाचे आहे की, त्यांच्या इतक्या वर्षांच्या साधनेचा मान ठेवत ईश्वराने NDA ला पूर्ण बहुमत देऊन त्यांची सत्ता अबाधित ठेवली आहे. तसेच आपल्या भक्ताकडून परत चूक होऊ नये म्हणून त्यांच्यावर नियंत्रण राहण्यासाठी चंद्रबाबू नायडू, तेलगू देसम पार्टी व नितीशकुमार, जदयू पार्टी यांच्या रूपाने अंकुश पण निर्माण केला आहे. श्री पवन कल्याण, अध्यक्ष, जनसेवा पार्टी यांच्या सारख्या चांगल्या नेत्याला NDA च्या टिममध्ये सामील करून त्यांचे हात बळकट केले आहेत. श्री पवन कल्याण पण देवीचे भक्तियुक्त कर्मयोगी आहेत.

❖ साधकांसाठी हे लक्षात घेणे आहे की, निवडणुकीच्या कठीण काळात भविष्याच्या दृष्टीने योग्य वेळी ईश्वराने त्यांच्याकडून आंध्रप्रदेश, बिहार व ओडिशा यांच्या संबंधित योग्य ते निर्णय पण करवून घेतले. ते निर्णय पण भविष्याच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरले.

❖ श्री. चंद्रबाबू नायडू, अध्यक्ष, तेलगू देसम पार्टी हे मागच्या ४० वर्षांपासून राजनीतिक क्षेत्रात कार्यरत असून अनेक वर्षे तेलंगणा-आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी काम केलेले आहे. त्यांच्या कारकीर्दीत त्यांनी सुद्धा इकॉनॉमिक रिफॉर्म्स व आपल्या राज्यांच्या सर्वांगीण विकासात महत्त्वाचे योगदान दिलेले आहे. इतकी वर्षे ते सुद्धा सामान्य लोकांचे जीवनमान उंचविण्यासाठी त्यांना मिळत आलेली सत्ता व संसाधने ईश्वराप्रती समर्पित भावनेने वापरत आहेत. त्यांच्या कारकीर्दीत हैद्राबादला सॉफ्टवेअर व फार्मा हब बनविण्याचे त्यांचेच व्हिजन मानले जाते. ते सुद्धा तिरूपती श्री बालाजींचे भक्तियुक्त कर्मयोगी आहेत व त्यांना सुद्धा आंध्रप्रदेश प्रांताचा सर्वांगीण विकास करावयाचा ध्यास आहे, त्यात त्यांना आता मोदीजींची मोलाची साथ मिळेल. देशाच्या विकासासाठी अशा दोन चांगल्या व्यक्तींना एकमेकांची साथ मिळण्याची व्यवस्था पण ईश्वराने आता निर्माण केलेली आहे.

❖ **सारांश :–**

श्रीमद्‌भगवद्‌गीतेतील या योग साधनेचा सिद्धांतच असा आहे की, ज्या साधकांकडून योगभ्रष्ट अवस्थेतेतून चुकीचे कर्म घडते त्यांच्या बाबतीत या योग साधनेच्या सामर्थ्यामुळे त्यांच्या व्यक्तीत्त्वात पुनश्च योगयुक्त अवस्थेत स्थिर होऊन कर्म करण्याची भावना स्थिर होते. अशा साधकांचा विवेक जागृत होतो. या योग साधनेत केलेली थोडीही प्रगती व्यर्थ जात नाही. ती दिवसेंदिवस वृद्धिगतच होत राहते.

२. माननीय श्री. मोदी साहेब व त्यांच्या टीममधील महत्त्वाच्या व्यक्ती भक्तियुक्त कर्मयोगी असल्यामुळे सार्वत्रिक निवडणुकीत आलेल्या अनपेक्षित परिणामांतून त्यांच्याकडून योगभ्रष्ट अवस्थेतून केल्या गेलेल्या कर्माच्या चुकांबद्दल त्यांच्यात नवीन जाणिवा जागृत होणे हा या योग साधनेचा एक स्वाभाविक भाग आहे. राज्यकर्ते म्हणून कर्म करत असलेल्या अशा राजयोग साधकांना येणाऱ्या नवीन परिस्थितीत ईश्वराचे मार्गदर्शन मिळत राहते. व त्यांचे पुढील पातळीवरील आध्यात्मिक शुद्धीकरण होणे सुरु होते. योगभ्रष्ट अवस्थेतून योगयुक्त अवस्थेत असे साधक परत स्थिर होतात व कर्मे करू लागतात. त्यादृष्टीने ईश्वराकडून वेळ व काळानुरूप त्यांना सर्व प्रकारचे आवश्यक असे बळ मिळत राहते. (श्रीमद्‌भगवद्‌गीता, अध्याय ६ : श्लोक ३७ ते ४४ व श्लोक ४५ ते ४७).

३. २०२४ च्या सार्वत्रिक निवडणूकीच्या परिणामांचा विचार केल्यास मध्यप्रदेश प्रांताचे माजी मुख्यमंत्री माननीय श्री. शिवराज सिंह चौहान यांच्या उदाहरणांवरून भक्तियुक्त कर्मयोगी कसे काम करतात हे स्पष्ट होते. माननीय श्री. मोदीजी पक्षाचे मुख्य असल्यामुळे त्यांनी प्रत्येक वेळी विनम्रतेने श्री. मोदीजींचे निर्णय म्हणजे ईश्वराचीच इच्छा असा विचार करत आपली कर्तव्यकर्मे करण्याकडे लक्ष दिल्याचे दिसून येते व त्यांनी पूर्ण ताकदीने निवडणूकीत प्रचारात भाग घेतला होता. निवडणूकीत ते स्वतः आठ लाख मतांपेक्षा जास्त मताधिक्य मिळवून विजयी झाले व त्यांच्या सामूहिक यशाच्या बाबतीत विचार केल्यास मध्यप्रदेश मध्ये त्यांच्या पक्षाने १००% जागा पण जिकल्या त्यात त्यांचे महत्त्वाचे योगदान होते. या प्रकारे ईश्वराने त्यांना मिळालेल्या व्यक्तिगत व सामूहिक यशातून त्याची पावती पण दिली.

४.	अशा अनपेक्षित परिणामांचाच एक भाग म्हणून सर्वच राजनीतिक पक्षात कार्यरत असलेले नेते, कार्यकर्ते, देशातील विद्वान लोक, तसेच सर्वसाधारण जनतेतील भक्तियुक्त कर्मयोग साधक, अशा सर्वांमध्ये ईश्वराच्या योजनेप्रमाणे नवीन जाणिवा जागृत होण्याची प्रक्रिया सुरु होत असते. त्यामुळे देशातील सर्वच नागरिकांना स्वतःच्या जीवनासाठी उन्नतीचे नवीन मार्ग मिळू लागतात. भक्तियुक्त कर्मयोग साधनेची ही गॅरंटीच आहे.

५.	सांसारिक जीवनाच्या सर्व कार्यक्षेत्रात कार्यरत असलेले लहान–थोर, स्त्री–पुरुष, विद्वान, उद्योजक, सामाजिक व राजनीतिक क्षेत्रात कार्यरत अशा सर्वच भक्तियुक्त कर्मयोग साधकांच्या जीवनाचा प्रवास याच पद्धतीने त्यांचे इष्ट (उपास्य, आराध्य) देवता संचालित करून त्यांना सर्वांगीण विकास, सुख, समृद्धी व यश मिळवून देत असते.

६.	अशाच प्रकारे ईश्वर भक्तियुक्त कर्मयोग साधकांना त्याच्या चुका दुरूस्त करण्यासाठी साथ देत असतात. जीवनात वेळेनुसार त्यांना योग्य ती शिक्षा व संरक्षण देतात. त्याचबरोबर मोठ्या जबाबदारींसाठी आवश्यक ते ज्ञान देतात व त्या दृष्टीने साधना पण करवून घेतात.

७.	श्री मोदिजींनी दिलेले २०४७ पर्यंतचे विकसित भारताचे उद्दिष्ट मुख्यतः ईश्वरानेच देशात प्रक्षेपित केले आहे. अशी लेखकाची अनुभूती आहे. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रत्येक नागरीकाला सांसारिक जीवनात स्वतःच्या स्वार्थापेक्षा मोठा उद्देश देण्याचा तो एक भाग आहे. सांसारिक जीवनात स्वार्थी भावनेतून कर्म करण्याची प्रक्रिया सहजपणे सुरु होते. परंतु, कर्तव्य भावतेतून कर्म करण्याची प्रक्रिया सुरू करून तिला विकसित करावी लागते. ईश्वराने जगाच्या नियंत्रणासाठी निश्चित केलेल्या नियमांनुसार ती प्रक्रिया सुरु असते.

(या पुस्तकातील भाग ३ येथील पॉईंट ३१, पृष्ठ १८८ ते १९२, श्लोकांसह वाचावा)

८.	त्या प्रक्रियेचाच एक भाग म्हणून देशात सर्वच क्षेत्रात कार्यरत असलेल्या सामान्य लोकांमधून सुद्धा अनेक भक्तियुक्त कर्मयोग साधक तयार होत असल्याचे दिसू लागले आहेत. अनेक लोकांमध्ये व्यक्तिगत, पारिवारिक व सामाजिक जीवनात या राजयोग (भक्तियुक्त कर्मयोग) साधनेची शिकवण जागृत होताना

दिसत आहे. त्याची त्यांना अनुभूती पण येत असल्याचे स्पष्ट होत आहे. अनेक आध्यात्मिक संस्था त्या दृष्टीने कार्य करत आहेत.

९. विकसित भारताची संकल्पना ही ईश्वराने निश्चित केलेल्या प्रक्रियेचाच एक भाग असल्यामुळे आज देशात सर्वच क्षेत्रांत कार्यरत असलेल्या, विविध विचारसरणींशी निगडित, विविध राजनीतिक पक्षांतील सामान्य लोकांमधून सुद्धा अनेक भक्तियुक्त कर्मयोग साधक तयार होत असल्याचे दिसू लागले आहे.

१०. त्याच दृष्टीकोनाचा एक भाग म्हणून भगवान श्रीकृष्णांनी माझ्या सारख्या अनेक सामान्य व्यक्तींना भक्तियुक्त कर्मयोग साधना शिकविली आहे, ती करवून घेत आहेत, त्याची अनुभूती पण देत आहेत व या साधनेचा प्रसार करण्याचे मार्गदर्शन पण करत आहेत.

**आवाहन :** श्रीमद्‌भगवद्‌गीतेतील राजयोग साधनेचे मुख्य सूत्र : ‘‘आपल्या स्वधर्माप्रमाणे आपली कर्तव्यकर्मे आपल्या इष्ट (उपास्य, आराध्य) देवतेची सेवा म्हणून करणे’’ सांसारिक जीवनात सुख, यश, सर्वांगीण विकास, समृद्धी मिळविण्यासाठी दैनंदिन जीवनात स्टॅण्डर्ड आपरेटिंग प्रोसिजर (SOP) म्हणून काम करते. तो दृष्टीकोण समोर ठेवून बीवायके योग आध्यात्मिक फोरम, छत्रपती संभाजीनगर, महाराष्ट्र, ही संस्था शेतकरी, कामगार बंधु-भगिनी, उद्योजक, नोकरदारवर्ग व समाजातील सर्व स्तरांवरील कार्यरत लोकांमध्ये राजयोग साधनेची पुनर्जागृती करण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील आहे. या संस्थेशी निगडित होणे म्हणजे ईश्वराच्या टीम मध्ये सम्मिलीत होणे असाच अर्थ आहे!

या संस्थेद्वारे प्रकाशित होणाऱ्या या राजयोग ‘भक्तियुक्त कर्मयोग’ पुस्तकाच्या माध्यमातून बीवायके योग या संस्थेने भक्तियुक्त कर्मयोग साधना देशातील सर्व समाजात पुनर्जागृत करण्याचे कार्य हातात घेतले आहे. इच्छुक सेवाभावी व्यक्तींना या ईश्वरीय कार्यात यथाशक्ती सहभाग घेता येईल. संस्थेची कोणाकडूनही आर्थिक अपेक्षा नाही.

------o○o------

# परिशिष्ट

सांसारिक जीवनात आध्यात्मिक ज्ञानाच्या संदर्भात वारंवार विचारले जाणारे काही महत्त्वपूर्ण प्रश्न व त्यांची थोडक्यात उत्तरे

**प्रश्न १ :** तक्ता क्रमांक १ मधील पहिले कर्तव्यकर्म प्रत्येक व्यक्तीस अंगीकारण्याची अनिवार्यता का आहे?

**उत्तर :** सांसारिक जीवनात आपली कर्तव्यकर्मे करण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला आपल्या अहंकाराच्या शक्तीचा तसेच प्रकृतीच्या किंवा प्रकृतीकडून मिळणाऱ्या अहंकाराच्या शक्तीचा सतत उपयोग करावा लागतो व तो करावयाचा पण असतो, त्यात काहीच गैर नाही, किंबहुना ते आवश्यकच आहे. परंतु, ईश्वराची ही अहंकार नावाची शक्ती मुळातच दोन विपरीत गुणांच्या सह अस्तित्वातून बनलेली असल्यामुळे या शक्तीला उद्देश नसतो व या शक्तीचे बळ पण मर्यादित असते. त्यामुळे आपल्या अहंकाराच्या शक्तीला म्हणजेच आपल्या जिद्दीला, आपल्या संकल्पांना दृढता येण्यासाठी व्यक्तीला इष्ट देवतेकडून मिळणाऱ्या योगमाया शक्तीची जोड देण्याची आवश्यकता असते. योगमाया शक्तीला उद्देश पण असतो व त्या शक्तीत अफाट बळ पण असते. त्यामुळे मूलतः बेभरवशाच्या अहंकाररूपी शक्तीला विधायक व सृजनात्मक स्वरूप प्राप्त होते व उर्वरित कोणतेही कर्तव्यकर्म फायदेशीर ठरते. त्यामुळे सांसारिक जीवनात यश, सुख, समृद्धी मिळविण्यासाठी प्रथम कर्तव्यकर्म टाळण्याला पर्याय नाही.

**प्रश्न २ :** आध्यात्मिक ज्ञान म्हणजे काय? आध्यात्मिक ज्ञानाच्या विकासाची सामान्य माणसाला काय गरज आहे?

**उत्तर :** या जगात आत्मा शरीराच्या रूपात प्रकट होतो व शरीराच्या रूपात

प्रकट झालेल्या आत्म्यास मूर्त स्वरूपात कर्म करण्यासाठी मी म्हणजे शरीर किंवा मी म्हणजे माझा अहंकार अशी एका विशिष्ट नावासकट ओळख दिली जाते. जन्मापासूनच तसे संस्कार केले जातात व ते मृत्यूपर्यंत राहतात. परंतु, शरीर नाशवंत असल्यामुळे प्रत्येक व्यक्तीस स्वतःच्या अविनाशी अस्तित्वाचे म्हणजे 'मी म्हणजे आत्मा किंवा मी म्हणजे योगी' या भावनेचा विकास करणे पण आवश्यक असते, यालाच आध्यात्मिक ज्ञान असे म्हणतात. या ज्ञानाच्या जाणिवेचा विकास न झाल्यास अहंकाराच्या शक्तीचा म्हणजे अहंकाराच्या दोन्ही विपरीत गुणांच्या शक्तीचा योग्य उपयोग करता येत नाही व सांसारिक जीवनात सुख, स्थैर्य मिळत नाही. सर्वांगीण विकास होत नाही. त्यामुळेच आध्यात्मिक ज्ञानाच्या विकासाची सामान्य माणसाला आवश्यकता असते.

**प्रश्न ३ :** भौतिक साधन सुविधांचा त्याग किती व कसा करावा? किंवा भौतिक साधनांचा उपयोग आपल्या विकासासाठी कसा करावा ?

**उत्तर :** सांसारिक जीवनात आपली कर्तव्यकर्मे करण्यासाठी उपयोगात येणाऱ्या कोणत्याही भौतिक साधन सुविधांचा त्याग करण्याची गरज नसते. या उलट सर्व प्रकारच्या भौतिक साधन सुविधांचा आपले कर्तव्यकर्म इष्ट देवतेप्रती सेवाभावनेने करण्यासाठी उपयोग करावा. ज्या गोष्टी आपले कर्तव्यकर्म करण्यासाठी वापरल्या जातात त्यांचा स्वतःसाठी किंवा आपल्या परिवारासाठी उपयोग करणे सुद्धा योग्य असते. हीच सर्वांगीण विकासाची गुरुकिल्ली आहे. कर्तव्यकर्मे करण्याच्या आड येणाऱ्या सर्व प्रकारच्या भौतिक साधन सुविधांचा त्याग करावा किंवा त्यांचा उपयोग टाळावा किंवा त्यांना दुर्लक्षित करावे. राजयोग साधनेत हे आपोआप घडते.

**प्रश्न ४ :** अहंकार ही वाईट प्रवृत्ती आहे का? आणि नसेल तर त्याचा सद्कार्यासाठी कसा उपयोग करावयाचा?

**उत्तर :** सांसारिक जीवनात अहंकार ही वाईट प्रवृत्ती नाही. ती केवळ एक शक्ती आहे. या शक्तीचा उपयोग सेवाभावनेने आपली कर्तव्यकर्मे करण्यासाठी करावा. हेच सत्कार्य आहे.

**प्रश्न ५ :** स्वधर्म कसा ओळखावा व वाढवावा?

**उत्तर :** सांसारिक जीवनात स्वधर्माची जाणीव व माहिती आपोआप होत असते. आपल्या इष्ट देवतेच्या संकेतानुसार वेळ व काळानुसार स्वधर्मात बदल पण आपोआप घडतात. ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. व्यक्तीच्या कर्म करण्यामागील मानसिकतेवर स्वधर्मात चांगले किंवा वाईट बदल पण आपोआप घडतात.

**प्रश्न ६ :** आपली इष्ट देवता कशी ओळखावी?

**उत्तर :** सांसारिक जीवनात आपल्या आईप्रमाणेच आपल्या इष्ट देवतेची जाणीव ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. त्यासाठी काही करावे लागत नाही. सेवाभावनेने आपली कर्मे करत राहिल्यास इष्ट देवता स्वतःच आपली ओळख देते व ते आपल्याला समजते.

**प्रश्न ७ :** आपल्या इष्ट देवतेचे काय महत्त्व आहे ? व इष्ट देवतेच्या साधनेची काय गरज आहे?

**उत्तर :** सांसारिक जीवनात आपल्या आईप्रमाणेच आपल्या इष्ट देवतेचे महत्त्व आहे. इष्ट देवतेची साधना न केल्यास सांसारिक जीवनात सुख-दुःख, यश-अपयश वगैरे वगैरे अशी मिश्र स्वरूपाची फळे मिळतात. हमखास यश मिळत नाही. सर्वांगीण विकास होत नाही. वैयक्तिक, पारिवारिक व व्यावसायिक जीवनात पण असुरक्षिततेची भावना नेहमीच राहते .

**प्रश्न ८ :** वाईट अहंकार किंवा बाधक अहंकार व चांगला अहंकार किंवा साधक अहंकार म्हणजे काय?

**उत्तर :** जेव्हा अहंकाराची शक्ती आत्म्याच्या नियंत्रणात कर्म करत असते तेव्हा तिला चांगला अहंकार किंवा साधक अहंकार असे म्हणतात. परंतु, जेव्हा आत्मा अहंकाराच्या शक्तीच्या नियंत्रणात कर्म करतो तेव्हा अहंकाराला वाईट किंवा बाधक अहंकार असे म्हणतात.

**उदाहरणार्थ :** इतरांकडून त्यांचे कर्तव्यकर्म स्वतःच्या शारीरिक, मानसिक किंवा बौद्धिक सुखाकरता करवून घेणे याला वाईट किंवा बाधक अहंकार म्हणतात. या उलट आपली स्वतःची कर्तव्यकर्मे इतरांच्या शारीरिक, मानसिक व बौद्धिक प्रगतीसाठी सेवाभावनेतून करणे याला चांगला किंवा साधक अहंकार असे म्हणतात.

**प्रश्न ९ :** कर्तव्यकर्म करत असताना कोणती भावना जोपासली पाहिजे ? व वाईट अहंकार/बाधक अहंकार वाढू न देण्यासाठी काय प्रयत्न केले पाहिजे ?

**उत्तर :** कर्तव्यकर्म करत असताना सेवाभाव ही भावना जोपासली पाहिजे. कर्तव्यकर्मे सेवाभावनेने करत राहण्याच्या प्रयत्नात राहिल्यास वाईट अहंकार म्हणजे बाधक अहंकार वाढत नाही.

**प्रश्न १० :** श्रीमद्‌भगवद्‌गीतेतील ही शिकवण इतकी श्रेष्ठ असून, ती लुप्त का झाली ? १२००-१३०० वर्षांपर्यंत भारत देश परकीय आक्रांतांच्या गुलामीत का गेला ? व इतक्या वर्षांपर्यंत गुलामीत का राहिला ?

**उत्तर :** पूर्वीच्या काळी या राजयोग साधनेमुळे राज्यकर्ते ते सामान्य प्रजा अशा सर्वांना यश, सुख, समृद्धी व समाधान मिळाले होते, मिळत होते. परंतु त्या गोष्टी प्राप्त झाल्यावर राज्यकर्त्यांनी या साधनेकडे दुर्लक्ष केले, सेवाभावनेतून आपली कर्तव्यकर्मे करण्याकडे दुर्लक्ष केले. त्यांना त्यांच्या स्वतःच्या इष्ट/आराध्य/उपास्य देवतेकडून येणाऱ्या शक्तीचे महत्त्व कळेनासे झाले. त्यामुळे त्यांना शत्रूंशी सामना करता आला नाही. परकीय शत्रूंच्या हातात सत्ता आल्यावर त्यांनी या राजयोग साधनेची सर्व बलस्थाने नष्ट करून टाकली. कालांतराने काही पिढ्यांच्या नंतर सामान्य लोकांना पण याचे ज्ञान राहिले नाही व देश गुलामीतच राहिला. प्रजेतील हुशार व कर्तृत्ववान व्यक्ती पण निष्प्रभ राहिल्या.

**प्रश्न ११ :** राज्यकर्त्यांचे काय चुकले ? व सामान्य प्रजेचे कुठे चुकले ?

**उत्तर :** सर्वांगीण प्रगती, यश, सुख, समृद्धी आल्यावर राज्यकर्त्यांनी राजयोग साधनेचे वैयक्तिक व सामाजिक जीवनात महत्त्व व सातत्य ठेवण्याकडे दुर्लक्ष केले. प्रजा पण सुखलोलुप झाली व त्यामुळे राज्यकर्त्यांवरील त्यांचे अदृश्य नियंत्रण पण राहिले नाही. राज्यकर्ते व प्रजा यांची भोगी वृत्ती नियंत्रणात राहिली नाही.

**प्रश्न १२ :** भारत देश १९४७ मध्ये स्वतंत्र झाल्यावर पण हिंदू समाजाची दुर्गती का झाली ? सामान्य प्रजेचे कुठे चुकले ?

**उत्तर :** भारत देश स्वतंत्र झाल्यावर सुद्धा हिंदू समाजाने आपल्या मतदानाचा हक्क वापरण्याचे आपले राष्ट्रीय कर्तव्यकर्म करण्याकडे दुर्लक्ष केले व

त्यामुळे राज्यकर्त्यांवर हिंदू समाजाचे काहीच नियंत्रण राहिले नाही. ज्या समाजातील प्रजेने मतदानाच्या हक्काचे महत्त्व जाणले त्यांचे नियंत्रण राज्यकर्त्यांवर प्रस्थापित झाले. राज्यकर्त्यांना हे लक्षात आल्यामुळे त्यांनी तुष्टीकरणाचे राजकारण करून पूर्वीचीच धोरणे सुरू ठेवली. हेच कारण आहे की, राज्यकर्त्यांना हिंदू समाजाचाच उपयोग करून हिंदू विरोधी कायदे करण्याचे धाडस झाले. त्यात देशाचे व सामान्य प्रजेचे नुकसान झाले.

**प्रश्न १३ :** दुष्ट लोक, खून, बलात्कार, भ्रष्टाचार करणाऱ्या लोकांच्या अहंकाराची शक्ती कुठून येते?

**उत्तर :** अशा व्यक्ती केवळ अहंकाराच्या शक्तीच्या प्रभावात कर्म करत असतात व आत्म्याकडून पुरवठा होत असणाऱ्या अतिरिक्त शक्तीच्या साहाय्याने अशी कर्मे करतात. आत्मा ईश्वराचा अंश असल्यामुळे आत्म्याकडे स्वतःची शक्ती असते व काही प्रमाणात ती शक्ती वापरण्याची स्वतंत्रता पण असते. वस्तुतः अशा व्यक्तीचा आत्माच त्याच्या अहंकाराच्या शक्तीच्या नियंत्रणात कर्म करत असतो.

**प्रश्न १४ :** सज्जन लोक दुर्जन लोकांसमोर नेहमी दुबळे का ठरतात?

**उत्तर :** सज्जनता ही सत्त्वगुणांचे प्रतीक आहे. भौतिकदृष्ट्या सत्त्वगुण तमोगुणापेक्षा दुर्बलच आहे. त्यामुळे असे घडते. परंतु, जे सज्जन लोक आपल्या इष्ट/आराध्य/उपास्य देवतेशी समर्पित भावनेने आपली कर्मे करतात त्यांच्या बुद्धीला त्यांच्या इष्ट देवतेच्या शक्तीचे बळ मिळते. त्यांच्या वाटेला तमोगुणी लोक जात नाहीत. अशा लोकांना तमोगुणी लोक घाबरून असतात.

**प्रश्न १५ :** आत्म्याच्या शक्तीचा खरा उपयोग काय? व तो कसा करावा?

**उत्तर :** आत्म्याच्या शक्तीचा मुख्य उपयोग शरीरातील अहंकार रुपी शक्तीला नियंत्रित ठेवून शरीराला कर्म करण्यासाठी सुदृढ करणे आहे. त्याबरोबर जीवनात प्राप्त झालेली कर्तव्यकर्मे शरीराकडून म्हणजेच आत्म्याच्या 'मी म्हणजे शरीर किंवा मी म्हणजे अहंकार' या भावनेतून परमात्म्याची सेवा करण्यासाठी असतो. त्यासाठी आत्म्याला अतिरिक्त शक्ती व स्वतंत्रता दिलेली असते.

**प्रश्न १६ :** अहंकाराच्या शक्तीचा खरा उपयोग काय? व तो कसा करावा?

**उत्तर :** अहंकाराच्या शक्तीचा मुख्य उपयोग शरीर, इंद्रिये, इंद्रिय धारणा, मन, बुद्धी व स्मृती (चित्त) या सर्वांचा वापर करून आत्म्याच्या मी म्हणजे योगी

किंवा मी म्हणजे आत्मा या भावनेच्या नियंत्रणात कर्मे करण्यासाठी आहे.

**प्रश्न १७ :** राजयोग साधनेचे मुख्य बलस्थान काय आहे?

**उत्तर :** या जगातील सर्व प्रकारची कर्मे करणारे सर्व लोक लौकिक यश, सुख, समृद्धी मिळविण्यासाठी वेगवेगळ्या योजना आखणे, चांगली व वाईट कर्मे करणे, अगदी दानधर्म करणे किंवा तोडगे करणे वगैरे वगैरे अशी वेदांमध्ये सांगितलेली विविध कर्मे करत असतात. असे सर्व काही प्रत्येक व्यक्तीकडून जन्मापासून-मृत्यूपर्यंत कळत नकळत ५ प्रकारच्या गोष्टी मिळवण्यासाठी प्रयत्न होत असतो. यास कोणीही अपवाद नाही. त्या ५ गोष्टी म्हणजे पोटाची भूक, पैसा, स्त्रीचे आकर्षण, सत्तेचे आकर्षण व विद्या-ज्ञानाची भूक होय. या सर्व गोष्टी मिळवण्यामध्ये व्यक्तीला भरपूर कष्ट व स्ट्रेस (तणाव) यामधून जावे लागते. या गोष्टी प्राप्त झाल्यावर त्या टिकविण्यासाठी टेन्शन (ताण) पण राहतेच व न मिळाल्यास व्याकुळता राहते. दैनंदिन जीवनात ताणतणाव राहतातच.

राजयोग साधकांना या पाचही गोष्टी त्यांच्या आवश्यकतेनुसार आपोआप व सहजपणे त्यांच्या इष्ट/आराध्य/उपास्य देवतेच्या त्यांच्यावरील असलेल्या कृपेमुळे वेळ, काळ व स्थितीनुसार प्राप्त होत राहतात. त्यांना त्यासाठी ताण-तणावामधून जावे लागत नाही. त्यामुळे ते नेहमीच स्ट्रेस फ्री आयुष्य जगतात.

**प्रश्न १८ :** राजयोग साधना एवढी सोपी का आहे?

**उत्तर :** शरीराच्या रूपात पृथ्वीवर आलेले प्रत्येक जीव ईश्वराचाच अंश आहे. आई व तिच्या तान्ह्या बाळासारखा हा संबंध आहे. त्यामुळे ईश्वराच्या जीवाकडून फारच कमी अपेक्षा असतात. ईश्वर जिवाकडून त्याची योग्यता व क्षमतेनुसारच अपेक्षा ठेवतात. त्यामुळे ईश्वराने राजयोग साधना अत्यंत सोपी केलेली आहे.

राजयोग साधनेतील सर्व गोष्टी जसे स्वधर्म, कर्तव्यकर्म, इष्ट देवता, सेवाभाव, अहंकाराची शक्ती व इष्ट देवतेकडून मिळणारी शक्ती अशा सर्वच गोष्टींवर राजयोग साधक बाह्य जगावर अवलंबून नसतो. त्यामुळे ही साधना सोपी आहे.

**प्रश्न १९ :** सर्वसाधारणपणे असा समज आहे की, प्रत्येक व्यक्तीला आपल्या प्रारब्ध कर्माचे वाईट फळ भोगावेच लागते. परंतु, पुस्तकात नमूद केले आहे की, राजयोग साधकांना प्रारब्ध कर्माच्या वाईट फळांपासून त्रास होत नाही, हे कसे होते ? व कसे शक्य आहे ?

**उत्तर :** यासाठी कर्माची फळे मिळण्यामागील प्रक्रिया समजून घेतली पाहिजे. कोणतेही कर्म केल्यावर त्याचे दृश्य फळ येण्याला दोन शक्ती कारणीभूत असतात.

**पहिली शक्ती म्हणजे** विश्वाच्या अहंकाराच्या विपरीत गुणांनी बनलेल्या शक्तीचे बळ. हे बळ नेहमीच मिश्र फळे, सुख–दुःख, यश–अपयश अशी फळे देते. विपरीत स्वभावाच्या अहंकाराच्या शक्तीची ती नैसर्गिकता आहे. अशा परिस्थितीत जर आपली क्रियमाण कर्मे अयोग्य अथवा वाईट असतील तर त्यात मिश्र फळाची भरच पडते व अंती अतिशय वाईट कर्मफळे मिळतात. त्यासाठीच इष्ट देवतेकडून मिळणाऱ्या शक्तीचे पाठबळ आपण मिळविणे आवश्यक असते.

**दुसरी शक्ती म्हणजे** आपल्या इष्ट देवतेकडून मिळणाऱ्या शक्तीचे बळ. कोणत्याही कर्माला इष्ट देवतेच्या शक्तीचे पाठबळ मिळाल्यावर येणारे कर्मफळ चांगलेच असते. पण या शक्तीचे पाठबळ मिळविण्यासाठी इष्ट देवतेप्रती समर्पित भावनेने कर्तव्यकर्म करणे आवश्यक असते. इष्ट देवता केवळ कर्तव्यकर्म करणाऱ्यांना आपले बळ प्रदान करते. इतरांच्या बाबतीत ते साक्षी भावाने केवळ व्यक्तीच्या क्रियमाण कर्मांकडे लक्ष ठेवते व वॉर्निंग देते. राजयोग साधना नेमके हेच करविते.

इष्ट देवतेकडून मिळणाऱ्या शक्तीच्या पाठबळामुळे वाईट प्रारब्ध कर्मफळ येणे शक्य नसते व त्या उलट चांगले प्रारब्ध कर्मफळ प्राप्त होते. इष्ट देवता व्यक्तीचा सर्वांगीण विकास, उन्नती होण्याच्या दृष्टीने आवश्यकतेनुसार प्रारब्ध व संचित कर्मफलांमध्ये बदल करते व राजयोग साधकांच्या क्रियमाण कर्माला त्याच्या कळत–नकळत नवीन दिशा देते. यामुळे प्रारब्ध कर्माची वाईट फळे मिळत नाहीत किंवा त्यांची तीव्रता निघून जाते.

(**टीप :** मागील जन्मात व भूतकाळात जी चांगली–वाईट, बरोबर–चूक अशी कर्मे आपल्याकडून केली गेलेली आहेत त्याबद्धल वर्तमान जन्मात काहीच

करणे शक्य नसते. परंतु, दैनंदिन जीवन जगत असताना आपण करत असलेल्या कर्तव्य कर्मांद्वारे आपल्या मागील जन्मातील तसेच भूतकाळातील वाईट कर्माच्या कर्मफलांची तीव्रता कमी करणे किंवा आपल्या इष्ट देवतेची कृपा संपादन करून तिच्या मार्गदर्शनाप्रमाणे स्वतःची कर्तव्यकर्मे करण्याच्या प्रयत्नात असल्यास त्या कर्म फळांना नष्ट करणे शक्य असते.)

**प्रश्न २० :** पितृदोष म्हणजे काय? राजयोग साधना पितृदोषांपासून सुरक्षा कशी देते? राजयोग साधनेमुळे पितृ दोषाचे निवारण कसे होते?

**उत्तर :** आपल्या आयुष्यात आपल्याकडून झालेल्या चुकीच्या कर्माची पुनरावृत्ती आपल्या मुलांकडून होऊ नये असा आपल्या पितरांचा प्रयत्न असतो. त्यासाठी ते आपल्याला सांसारिक जीवनात अडचणी निर्माण करतात. यालाच पितृदोष म्हणतात. आपल्या परिवारातील मुले-मुली, पतीपत्नी व मातापिता यांच्याशी निगडित कर्तव्यकर्मे सेवाभावनेने केल्याने आपल्या पितरांकडून झालेल्या चुकीच्या कर्मांच्या फळांचे परिमार्जन होते व पितरांची इच्छा पूर्ण होते. अडचणी निघून जातात. पितृदोषाचे निवारण होते. उलटपक्षी पितरांचे साहाय्य प्राप्त होते.

**प्रश्न २१ :** राजयोग साधना, तीन गुणांचा व ईश्वराचा काय संबंध आहे? ही साधना सर्वश्रेष्ठ का आहे?

**उत्तर :** राजयोग साधनेतील स्वधर्म शरीराशी संबंधित आहे, त्यामुळे तमोगुण दर्शवितो. कर्तव्यकर्म रजोगुण दर्शवितो, कर्तव्यकर्मांद्वारे इष्ट देवतेच्या प्रती सेवाभाव सत्त्वगुण दर्शवितो. त्यामुळे राजयोग साधनेत शरीराच्या रूपातील आत्म्याचा ईश्वराशी सरळ संबंध प्रस्थापित होतो. त्यामुळे ही साधना सर्वश्रेष्ठ योगसाधना आहे.

**प्रश्न २२ :** सनातन धर्माच्या या साधनेचा व जगातील इतर सर्व धर्मांचा काय संबंध आहे?

**उत्तर :** जगातील सर्व धर्मांची उत्पत्ती सनातन धर्माच्या सूत्राच्या ज्ञानामधूनच झालेली आहे. काही धर्म पूर्णपणे तमोगुणावर आधारित आहेत. काही धर्म पूर्णपणे रजोगुणावर आधारित आहेत.

सर्वसाधारणपणे हिंदूधर्म, जैन धर्म, बौद्ध धर्म, शीख धर्म असे बरेचसे धर्म सत्वगुणावर आधारित आहेत. त्याचमुळे त्यांच्यात नैसर्गिक एकी आहे.

**प्रश्न २३ :** राजयोग साधनेत तक्त्यांत दर्शविलेल्या चौकोनातील सूत्राचा, त्यातील माहितीचा व त्यांना जोडणी करणाऱ्या गतिशील कड्यांचा (डायनॅमिक लिंक्स्) उपयोग कसा होतो ?

**उत्तर :** त्या त्या चौकोनातील सूत्राप्रमाणे कर्तव्यकर्म करणे सुरू केल्यावर शरीर, बुद्धी, मन, विपरीत स्वभावाची अहंकाराची शक्ती व चित्त यांचे योग्य संतुलन चालू होते. त्यामुळे आपल्या इष्ट /आराध्य/उपास्य देवतेला प्रारब्ध व संचित कर्मांचे आपल्या सर्वांगीण प्रगतीसाठी नियंत्रण व संचालन करणे शक्य होते. आपली इष्ट देवता आपल्या इच्छेशिवाय, आपल्या अनुमतीशिवाय व आपल्या सहयोगाशिवाय आपल्या सांसारिक आयुष्यात ढवळाढवळ करत नाही. आपली इष्ट देवता (आराध्य/उपास्य) जीवाला दिलेल्या स्वतंत्रतेत कधीही हस्तक्षेप करत नाही. आपल्याला सर्व प्रकारचे ज्ञान, वॉर्निंग, धोक्याचा इशारा वगैरे वगैरे मिळण्याचीही व्यवस्था करते पण कर्म करण्याची आपली स्वतंत्रता अबाधित ठेवते.

**प्रश्न २४ :** आजच्या काळातील आर्टिफिशियल इंटेलिजन्स, गुगल, इंटरनेट, स्मार्टफोन यांच्या उदाहरणातून नक्की काय सांगायचे आहे ?

**उत्तर :** या सर्व गोष्टी ईश्वराच्या आर्टिफिशिअल इंटेलिजन्सचाच एक छोटासा अंश आहे. हे स्पष्ट करावयाचे आहे. हे समजले तर यांचा उपयोग जीवनात सुख, यश, समृद्धी वगैरे वगैरे मिळविण्यासाठी जास्त चांगला करता येईल व या सर्व गोष्टीचा दुष्प्रभाव शत्रूंच्याच नाशाला कारणीभूत करता येईल. सांसारिक जीवनाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आवश्यक असलेल्या मी म्हणजे शरीर किंवा मी म्हणजे अहंकार व मी म्हणजे योगी किंवा मी म्हणजे आत्मा या ज्ञानाचे महत्त्व कळेल. देशातील सर्व लोकांमध्ये हि जाणीव जागृत  होण्यात भारताचे विश्वगुरू होणे, रामराज्याची पुनरावृत्ती होणे म्हणजेच सर्वसामान्य माणसाचे आयुष्य सुखी, समाधानी व समृद्ध होण्याचे रहस्य दडलेले आहे.

**प्रश्न २५ :** पूजा, अर्चना, मंत्रशास्त्र, ज्योतिषशास्त्र, रत्नशास्त्र, वास्तुशास्त्र, नामस्मरण, ध्यानशास्त्र, यज्ञशास्त्र अशा विविध आध्यात्मिक साधनांचा राजयोग साधनेशी कसा संबंध आहे?

**उत्तर :** राजयोग साधकांना या सर्वांचे सटीक (अचूक)ज्ञान व त्यांचा दैनंदिन जीवनात उपयोग व अनुभूती इष्ट देवतेच्या त्यांच्यावरील कृपेमुळे वेळ, काळ व त्यांच्या आवश्यकतेनुसार आपोआप मिळत राहते. तसेच त्यांचा त्यांना उपयोग पण होतो. ते सर्व वेद, उपनिषद, ब्रह्मसूत्र, पुराण वगैरे यांतील ज्ञान आहे. परंतु, राजयोग साधकांना त्यांच्या मागे लागण्याची व त्या ज्ञानाच्या आहारी जाण्याची काहीही आवश्यकता नसते. राजयोग साधकांना याची पूर्ण जाणीव असते की, त्यांची इष्ट देवता अशा सर्व शास्त्रांचा वेळेनुसार सटीक वापर करण्यास सांगून त्यांचे यश, सुख, समृद्धी इष्ट देवतेच्या योजनेप्रमाणे आणून देत असते. हि साधना अंगिकारल्यावर राजयोग साधकांची जाणीव जागृत होते व त्यांची धारणा अशी होते की, हि सर्व शास्त्रे ईश्वराच्या आर्टिफिशियल इंटेलिजन्सचाच एक भाग आहे व त्यांचा उपयोग राजयोग साधना सुलभ होण्यासाठीच आहे. त्यामुळे राजयोग साधकांना त्या सर्व शास्त्रांचा विरोध करण्याचे कारण पण नसते.

**प्रश्न २६ :** कर्तव्यकर्म व भक्ती याची सांगड इष्ट देवतेची सेवा म्हणून घालण्याच्या आवश्यकतेचे प्रमाण, पुरावा किंवा दाखला काय? व ते कसे जाणावे?

**उत्तर :** अ) याचे सरळ उत्तर म्हणजे राजयोग साधना पुस्तकात सांगितल्याप्रमाणे ९१ दिवस आचरणात आणून पाहणे व अनुभूती घेऊन खात्री करून घेणे.

ब) ज्ञानाच्या आधारे हे समजून घ्यावयाचे असल्यास आपल्या संपर्कातील यशस्वी लोकांचे तसेच पुस्तकात दिलेल्या रोल मॉडेल्सची चरित्रे तपासणे.

क) भारताचा मागील १२०० ते १३०० वर्षांचा तसेच १९४७ साली भारत स्वतंत्र झाल्यापासून श्री मोदी साहेब पंतप्रधान होईपर्यंतच्या काळाचे अवलोकन करावे. या कालावधीत लोक कर्म करत होते व भक्ती पण करत होते पण हिंदू समाजाचे एकही देवस्थान वाचवू शकले नाही. अगदी भारत स्वतंत्र झाल्यानंतर

सुद्धा ते शक्य झाले नाही. भारताच्या लोकसभेत अगदी हिंदू खासदार (MP) ची संख्या जास्त असून सुद्धा हिंदुविरोधी कायद्यांना आळा घालता आला नाही.

ड) वारकरी संप्रदायातील शेतकरीवर्ग भक्ती करण्यात कोणतीही कसूर ठेवत नाही. परंतु त्यांच्या शेतीचे प्रश्न मिटत नाहीत. सरकारकडे त्यांना कर्जमाफी मागावी लागते. इतक्या वर्षात शेतकरी सरकारलाच कर्ज देणारे झाले नाहीत. तसेच प्रामाणिकपणे कर्म करणारे कर्मचारी लोक, नोकरदारवर्ग सुद्धा सुखी व समाधानी झाला नाही. सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षणाची मागणी राहिलीच. सामान्य लोकांची सृजनात्मक शक्ती कमी झाली. त्यामुळे नोकऱ्या निर्माण करणारे लोक कमी झाले. भारतात खूप उद्योजक निर्माण झाले नाहीत. सामान्य लोकांमध्ये सृजनात्मक शक्ती विकसित होण्यासाठी भक्ती आणि कर्म एकत्रित होणे आवश्यक असते.

**प्रश्न २७ :** श्रीमद्‌भगवद्‌गीतेतील ज्ञान व इतर सर्व प्रकारच्या ज्ञानामध्ये मुख्य फरक काय आहे?

**उत्तर :** श्रीमद्‌भगवद्‌गीतेतील ज्ञान साक्षात ईश्वराने सांगितले आहे. ईश्वराला मानवास आमिष दाखवण्याचे कोणतेही कारण नाही. त्यामुळे गीतेतील ज्ञानात सांसारिक जीवनात आकर्षण वाटणाऱ्या सुख, यश, समृद्धीचे असे कोणतेही गाजर दाखविलेले नाही. उलटपक्षी त्या सर्व गोष्टी आपोआप येण्याची प्रक्रिया ईश्वराने सर्व मानव जातीला उघड केलेली आहे. ईश्वराची मानव जातीशी असलेली वचनबद्धता (कमिटमेंट) पण स्पष्ट केली आहे.

सांसारिक जीवनात सामान्यतः कर्मफळाची इच्छा व्यक्तीला कर्माशी बांधून ठेवते. त्यामुळे कर्मकर्ता भविष्यात जगतो व त्यात क्रियमाण कर्मावर लक्ष केंद्रित करणे होत नाही व कर्म चुकते. श्रीमद्‌भगवद्‌गीतेतील राजयोगसाधना व्यक्तीला कर्मफळाच्या बंधनातून मोकळे करते व त्यामुळे कर्मकर्ता वर्तमानमध्ये जगतो व त्यास क्रियमाण कर्मावर लक्ष केंद्रित करणे सुलभ होते व कर्म बरोबर होते.

इतर सर्व ज्ञान पद्धतीत सांसारिक जीवनात आकर्षण असलेल्या सुख, यश, समृद्धी मिळण्यासाठी कर्म कसे करावे याचे ज्ञान सांगितलेले आहे. त्यासाठी तज्ञ गुरूंची आवश्यकता असते. कर्म करण्याचे ज्ञान कठीण आहे; त्यामुळे कर्म

करण्यात चूक होतेच व आपण कर्माच्या नियमात अडकतो व केलेल्या कर्माची मिश्र स्वरूपाची चांगले-वाईट, सुख- दुःख अशी कर्मफळे अनुभवतो.

**प्रश्न २८ :** भगवद्‌गीतेवरील या पुस्तकात तसेच भगवद्‌गीतेवरील इतर टीका भाषांतरे यांच्यात मुख्य फरक काय आहे ?

**उत्तर :** हे पुस्तक आजच्या काळातील आर्टिफिशियल इंटेलिजन्स, गुगल, इंटरनेट, स्वयंचलित वैज्ञानिक उपकरणे, रोबोट, अंतरिक्ष यान, स्वयंचलित विध्वंसक अस्त्रे वगैरे वगैरे अशा संदर्भात भगवद्‌गीतेवरील अंतर्निहित शिकवणुकीच्या अनुभूतींवर सांसारिक जीवनात यश, सुख, समृद्धी व समाधान मिळविण्याच्या उद्देशाने प्रस्तुत केलेले आहे.

सामान्य लोकांच्या जीवनावर आजच्या काळातील विज्ञानाच्या आत्यंतिक प्रभावामुळे आजचे जीवन अतिशय गतिमान झाले आहे व त्यामुळे भगवद्‌गीतेवरील टीका, श्लोकांचे विवरण वाचणे शक्य होत नाही व त्यांचा रोजच्या जीवनात यश मिळविण्याशी संबंध कसा जोडावा हे समजत नाही. या पुस्तकातील राजयोगाचे सूत्र रोजच्या जीवनात यश मिळविण्याशी व्हॉट्स ॲप सारखे कामास येते.

**प्रश्न २९ :** भगवद्‌गीतेवरील या पुस्तकाची विशेषता काय आहे ?

**उत्तर :** अर्जुन पूर्णपणे सांसारिक आयुष्य जगणारी व्यक्ती होती, त्याचे प्रश्न पण सांसारिक आयुष्याशी निगडित होते. त्याला त्यासाठीच मार्गदर्शन हवे होते. भगवान श्रीकृष्ण स्वतः ईश्वर असले तरी त्यांना अर्जुनाला त्याच्या सांसारिक गरजेच्या संदर्भातच मार्गदर्शन करावयाचे होते. अर्जुनाने त्याचे सांसारिक जीवन सुदृढ करावे व पुढे पृथ्वीवरील सर्वसामान्य लोकांचे सांसारिक जीवन पण उन्नत करावे अशी भगवान श्रीकृष्णांची इच्छा होती.

भगवद्‌गीतेतील ज्ञान भगवान श्रीकृष्णांनी याच मुख्य आधारावर सांगितले आहे व अर्जुनाने पण याच भूमिकेतून ते ग्रहण केले आहे. त्यामुळे हे पुस्तक गीतेतील सांसारिक जीवन उन्नत करण्यासाठी आवश्यक अशा व्यावहारिक ज्ञानाच्या अर्जुनाच्या अनुभूतीवर आधारित आहे. सांसारिक जीवनात आपण सर्व अर्जुनच आहोत. त्यामुळे सर्व श्लोकांवर टीका किंवा विवेचन करण्यापेक्षा अर्जुनाला हे गीतेतील व्यावहारिक ज्ञान कसे समजले, त्याने जीवनात ते कसे

अमलात आणले व त्याला कसे यश मिळाले हे दर्शविण्याचा प्रयत्न केला आहे. तीच आजच्या काळाची आवश्यकता आहे.

माझ्या अनुभूतीनुसार भगवान श्रीकृष्णांना या पृथ्वीवर अवतार घेऊन अर्जुनाशी मोक्षाची चर्चा करण्याची काहीही आवश्यकता नव्हती. प्रभू श्रीरामांनी पण तसे केले नव्हते. सांसारिक जीवन जगणाऱ्यांना मोक्षसाधना अंगीकारण्याची आवश्यकता पण वाटत नाही. ईश्वराने आपल्या कोणत्याच अवतारात सांसारिक लोकांशी मोक्षसाधनेवर चर्चा केलेली नाही.

हे समजून घेणे महत्त्वाचे आहे की, श्री आदि शंकराचार्यांनी काळाच्या गरजेनुसार गीतेतील ज्ञानयोग साधनेवर भर दिला, तसेच श्री ज्ञानेश्वर माउलींनी त्यांच्या काळाच्या गरजेनुसार गीतेतील भक्तियोग साधनेवर भर दिला. भगवान श्री महावीर, भगवान श्री बुद्ध, भगवान श्री गुरुनानकदेव यांनीही काळाच्या अनुसार व समाजाच्या आवश्यकतेनुसार गीतेतील ज्ञान सांगितले आहे. परंतु, त्या सर्वांनीच सांसारिक लोकांसाठी स्वधर्मानुसार कर्तव्यकर्म ईश्वराप्रती सेवाभावनेने केले पाहिजे, हे गीतेतील अंतर्निहित सूत्र त्यांच्या विवेचनात कायम ठेवले.

**प्रश्न ३० :** पुस्तकात आध्यात्मिक ज्ञान मिळविण्याच्या मागे फार लागू नये असे दर्शविले आहे. त्याचे प्रमाण काय?

**उत्तर :** भक्तियुक्त कर्मयोग साधकांसाठी ईश्वराने ती जबाबदारी स्वतःकडे घेतलेली आहे, गीतेत तसा स्पष्ट उल्लेख आहे. त्याप्रमाणे राजयोग साधकाची ती जबाबदारी त्याची इष्टदेवता स्वतः घेत असते.

प्रभू श्रीरामांनी पण आपल्या जीवनातून सांसारिक लोकांना हे स्पष्ट करून दाखविले आहे. त्यांच्या जीवनाचा अभ्यास केल्यास दिसून येते की, श्री विश्वामित्र ऋषींच्या यज्ञाचे संरक्षण करण्यास गेल्यापासून रावणवधापर्यंत प्रभू श्रीरामांना वेळोवेळी आवश्यक ते सर्व प्रकारचे अस्त्र-शस्त्रज्ञान, विद्या, सर्वप्रकारची मदत, साह्य वगैरे वगैरे वेळ, काळ व त्यांच्या आवश्यकतेनुसार मिळत गेलेले आहे. मानवी रूपातील ईश्वराला ह्याच गोष्टींबद्दल भक्तियुक्त कर्मयोग साधकांत विश्वास व जाणीव संस्कारित करावयाची होती, मार्गदर्शन करावयाचे होते. हेच प्रभू श्रीरामांच्या अवताराचे मुख्य प्रयोजन होते. अर्जुनाच्या बाबतीत पण हेच दिसून येते. भगवान श्रीकृष्णांनी वेळ, काळ व आवश्यकतेनुसार अर्जुनाला सर्व गोष्टी

मिळत राहतील याची तजवीज केलेली होती. अर्जुनाची इष्ट देवता म्हणून भगवान श्रीकृष्णांनी ती जबाबदारी स्वतःकडे घेतली होती.

**प्रश्न ३१ :** या जगात जन्म घेतल्यावर आमची कॉन्स्टिट्युशनल पोझिशन काय आहे ? व त्या संवैधानिक पोझिशनला न्याय कसा द्यावा ?

**उत्तर :** प्रत्येक आत्मा ईश्वराचा अंश असल्यामुळे जसे शरीराचे विविध अवयव सतत शरीराच्या सेवेत असतात, त्याचप्रमाणे शरीराच्या वेशातील आत्म्याने सतत ईश्वराच्या (आपल्या इष्ट/आराध्य/उपास्य)देवतेच्या सेवेत राहणे, ही प्रत्येक व्यक्तीची या जगातील कॉन्स्टिट्युशनल पोझिशन आहे. हेच येथील जीवनाचे परम सत्य आहे. याला कोणीही अपवाद नाही. यासाठी पुस्तकात दर्शविलेल्या ६ प्रकारच्या कर्तव्यकर्मांपैकी जमतील तेवढी कर्तव्यकर्मे आपल्या क्षमतेनुसार सेवाभावनेने ईश्वराची सेवा म्हणून करणे. हा एकमेव पर्याय आहे.

या जगातील कोणत्याही सजीव किंवा निर्जीव गोष्टीचे निरीक्षण केल्यास हे स्पष्ट होते की, जगातील प्रत्येक व्यक्ती कोणत्या न कोणत्या प्रकारे, कोणत्या न कोणत्या रूपात कोणाचीतरी सेवाच करत असतो. याला कोणीही अपवाद नाही.

**प्रश्न ३२ :** आपल्या कर्तव्यकर्मांना आपल्या इष्ट देवतेशी कसे जोडावे व त्या कर्तव्यकर्मांना आपल्या इष्ट देवतेची सेवा म्हणून करण्याची मानसिकता कशी विकसित करावी ? (श्रीमद्‌भगवद्‌गीता अध्याय १२ : श्लोक १०)

**उत्तर :** आपली कर्तव्यकर्मे सेवाभावनेतून थेट ईश्वरासाठी म्हणून करणे. सांसारिक जीवनातील आपली सर्व प्रकारची वैयक्तिक कर्तव्ये जसे आध्यात्मिक, लौकिक व व्यावसायिक शिक्षण प्राप्त करणे, तसेच पारिवारिक, व्यावसायिक, सामाजिक व राष्ट्रीय कर्तव्ये अशी सर्वच कर्तव्यकर्मे व्यक्तीच्या योग्यतेनुसार ईश्वराने निश्चित केलेल्या स्वधर्मानुसारच आलेली असतात. हे स्मरणात ठेवले, तर कर्तव्यकर्मे ईश्वराशी जोडणे सहज शक्य होते.

**स्वधर्म व कर्तव्यकर्माच्या बाबतीत मानसिकता कशी विकसित करावी, कशी ठेवावी ?** या सांसारिक जीवनात आपण ईश्वराचे प्रतिनिधी आहोत व ईश्वराची सेवा करणे आपली मुख्य जबाबदारी आहे. ईश्वराची सेवा करण्यासाठीच आपल्याला ईश्वराने स्वधर्म व त्यानुसार येणारी कर्तव्यकर्मे अशी दोन साधने दिलेली आहे. त्यामुळे कर्तव्यकर्मे सेवाभावनेतूनच केली पाहिजेत.

असे विचार व भावना आपल्या मनात सातत्याने रुजवाव्यात. आपल्या इष्ट देवतेला आदर व प्रेमाने आपल्या मनातील सर्व चांगल्या व वाईट भावना निवेदन कराव्यात. आपली कर्तव्यकर्मे ईश्वराची सेवा म्हणून केल्यास व्यक्तीच्या सांसारिक सुखांची व दुःखांचे निवारण करण्याची जबाबदारी ईश्वर स्वतः आपल्याकडे घेतात. हे ध्यानात ठेवले तर अशी मानसिकता विकसित होते.

आपण आपली सर्व प्रकारची कर्तव्यकर्मे ईश्वरासाठी करणे चालू केल्यावर येणाऱ्या कर्मफळांवरील आसक्तीतून तसेच कर्मफळांच्या बाबतीत नैसर्गिकरीत्या येणारा आमचा फाजील आत्मविश्वास, चिंता, हुरहुर, ताणतणाव, अपयश (यश), निराशा (आशा), क्लेश, कष्ट (उत्साह) अशा कर्मफळांच्या किंवा त्यांच्या परिणामांच्या बाबतीतील सर्व प्रकारच्या उलट सुलट भावनांपासून होणाऱ्या त्रासातून आपण आपोआप मुक्त होतो. कर्तव्यकर्म अशा त्रासदायक भावनांनी प्रभावित राहत नाही. त्यासाठी वेगळे काहीही करावे लागत नाही. कर्मफळाची अपेक्षा न ठेवता कर्म करण्याची ही सर्वात सोपी आणि श्रेष्ठ पद्धती आहे. या पद्धतीत कर्तव्यकर्म करण्यावर लक्ष केंद्रित करणे सोपे होते व येणाऱ्या कर्मफळावर आपण आसक्त पण होत नाही.

स्वतःच्या स्वधर्माप्रमाणे करण्यात येणाऱ्या प्रत्येक कर्तव्यकर्मात त्याचा मूळ उद्देश अंगभूत असतोच. त्यामुळे सत्य असे आहे की, आपले कर्तव्यकर्म करत असताना येणाऱ्या कर्मफळावर सतत विचार केंद्रित करण्याची काहीही आवश्यकता नसते. अशा परिस्थितीत कर्मफळ चांगले आले तर कर्तव्यकर्म नीटपणे झाल्याचा आपल्याला आनंद असतो. परंतु येणाऱ्या कर्मफळावर अधिकार ईश्वराचा असल्यामुळे आपण ते जबाबदारीने हाताळतो. याउलट कर्मफळ चांगले आले नाही तर आपण सावध होतो व कर्तव्यकर्म जास्त सावधपणे करू लागतो. आपल्याला आत्मनिरीक्षण करण्याची सवय लागते. आपला विवेक जागृत होतो व सुख-दुःख, यश-अपयश वगैरे वगैरे अशा सर्वच विपरीत परिस्थितीत आपल्याला ईश्वराचे मार्गदर्शन मिळू लागते व ते आपल्याला जाणवते.

**प्रश्न ३३ :** आजच्या सॉफ्टवेअर, AI वैज्ञानिक प्रगतीवर आधारित वैज्ञानिक उपकरणांचा फायदा व तोटा काय? त्यांच्या दुष्परिणामांपासून दूर राहत त्यांचा फायदेशीर उपयोग कसा करून घ्यावा ?

**उत्तर : फायदे :** होय, फायदे बरेच आहेत. आजच्या वैज्ञानिक उपकरणांमुळे रिझल्ट्स फास्ट मिळतात. त्यामुळे दैनंदिन जीवन गतिमान झाले आहे. वैज्ञानिक उपकरणांमुळे शारीरिक कष्ट खूप कमी झाले आहेत. हा मुख्य फायदा आहे. परंतु या सर्व AI, सॉफ्टवेअर वैज्ञानिक उपकरणांचा मूळ उद्देश मानवी जीवनात सेवाभाव विकसित करण्याचा नसून त्या उपकरणांचा व्यापार करून जास्तीत जास्त नफा मिळविणे असा आहे. पुढे येणाऱ्या नफ्यातून विविध भौतिक सुखांचा आस्वाद, भोग घेणे असाच आहे.

**तोटे काय आहेत?** हे लक्षात घेणे आहे की, सांसारिक जीवनात सर्व प्रकारच्या सांसारिक सुखांची अनुभूती वस्तुतः आपण आपल्या मनाद्वारेच घेत असतो. आजच्या सॉफ्टवेअर, AI च्या युगात ती अनुभूती फास्ट मिळत असल्यामुळे आजच्या वैज्ञानिक उपकरणांमुळे शरीराच्या व मुख्य म्हणजे बुद्धीच्या नैसर्गिक क्षमतेचा उपयोग करण्याची मानसिकता विकसित होण्याला मर्यादा येतात. त्यासाठी व्यक्तिमत्वात स्पेशल असा फोकस विकसित करणे आवश्यक आहे. तसे केले गेले नाही तर शारीरिक, मानसिक व बौद्धिक आळस पुष्ट होतो.

आपण हे नाकारू शकत नाही की, मानवाच्या क्रिएटिव्हिटीमुळेच आजची सॉफ्टवेअर, AI वर आधारित वैज्ञानिक प्रगती झाली आहे व ती सामान्य व्यक्तीपर्यंत पोहोचली आहे, पोहोचत आहे. या प्रगतीमुळे सर्व प्रकारच्या वैज्ञानिक गॅझेटवर दिवसेंदिवस डिपेंडेबिलिटी वाढतच जात आहे. परंतु, आपण हे देखील नाकारू शकत नाही की, जे लोक यांचा योग्य वापर करू शकत नाही त्यांचा आळस वाढत आहे व त्यांची व्यक्तीगत क्रिएटिव्हिटी पण कमी होत आहे. होत राहते. हाच मुख्य तोटा आहे. या उपकरणांमुळे वाईट गोष्टी लवकर आत्मसात करणे पण सोपे झाले आहे. त्यामुळे व्यक्तीतील अहंकाराच्या दोन विपरीत गुणांनी बनलेल्या ऊर्जाशक्तीवर अशा उपकरणांचा अनिष्ट प्रभाव पडतो व व्यक्तीतील मी म्हणजे माझा अहंकार, मी म्हणजे माझे वैयक्तिक सुख ही भावना सतत पुष्ट होत राहते.

तसेच आजच्या या सॉफ्टवेअर AI ने व्यापलेल्या युगात मानवाच्या अस्तित्वाचा मुख्य भाग असलेल्या अहंकाररूपी शक्तीच्या दोन विपरीत गुणांच्या शक्तीत असंतुलन निर्माण होत आहे. तीच या AI सॉफ्टवेअर वर आधारित वैज्ञानिक उपकरणांची मर्यादा आहे. ही मर्यादाच या वैज्ञानिक प्रगतीचे बलस्थान आहे व विकनेस पण आहे. हे समजून घेतले तरच त्यांचा फायदेशीर उपयोग करणे शक्य आहे.

सत्य असे आहे की, व्यक्तीची क्रिएटिव्हिटी कमी झाली की, व्यक्तीतील जिवंत अस्तित्वातील पहिली भावना म्हणजे मी कोण? तर मी म्हणजे शरीर, मी म्हणजे माझा अहंकार, मी म्हणजे माझे मन, मी म्हणजे माझी बुद्धी अशा सर्व भावना पुष्ट होतात. व्यक्ती स्वार्थी होते. अशा परिस्थितीत सांसारिक जीवनाच्या यशासाठी आवश्यक असलेली व्यक्तीतील अति महत्त्वपूर्ण दुसरी भावना : मी म्हणजे योगी, मी म्हणजे आत्मा, मी म्हणजे माझी कर्तव्ये करण्याची जिद्द, या भावनेचा विकास दुर्लक्षित राहतो.

**मग मार्ग काय?** सत्य असे आहे की, मी कोण? तर मी म्हणजे माझा अहंकार (भोगी वृत्ती) व तसेच मी कोण? मी म्हणजे योगी (आत्मा) या दोन्ही भूमिकांमध्ये संतुलन साधल्याशिवाय अहंकाररूपी शक्तीतील विपरीत गुणांच्या शक्तीत संतुलन मिळवणे शक्य नाही व त्यासाठी कर्तव्यकर्मे इष्ट देवतेप्रती सेवाभावनेतून करणे हा कौटुंबिक व सामाजिक जीवनात सुख व यश मिळविण्याचा यशोमार्ग आहे.

वरील दोन्ही भावनांचा विकास सांसारिक जीवनात सर्वांगीण विकास होण्यास आवश्यक आहे. त्याला पर्याय नाही. आजच्या सॉफ्टवेअर, AI वैज्ञानिक प्रगतीवर आधारित वैज्ञानिक उपकरणांचा विधायक उपयोग करण्याचा सोपा मार्ग म्हणजे दैनंदिन जीवनातील आपल्या कर्तव्यकर्मांबरोबरच इष्ट देवतेप्रती असलेली कर्तव्यकर्मे करण्यासाठी सुद्धा त्या उपकरणांचा जाणीवपूर्वक जमेल तसा, जमेल तितका वापर करणे. त्यांच्या अशा वापरामुळेच ती उपकरणे सुद्धा शुद्ध (आध्यात्मिक) होतात व आपल्या व्यक्तीमत्वातील दुसरी अति महत्त्वपूर्ण भावना : मी कोण? तर मी म्हणजे योगी, मी म्हणजे आत्मा या भावनेचा विकास फास्ट होऊ लागतो व ती भावना जगणे पण सुलभ होते.

**प्रश्न ३४ :** आध्यात्मिक किंवा शुद्ध कर्तव्यकर्मे करणे म्हणजे काय ? कर्मे शुद्ध कशी होतात ? त्यांचा फायदा काय होतो ?

**उत्तर :** ''सांसारिक जीवनात आमच्या मनाच्याद्वारे आम्ही सुखाची अनुभूती घेत असतो; पण वस्तुतः आमची कर्तव्यकर्मे व आमची आध्यात्मिक बुद्धी आमच्या सुखाच्या निर्मितीला जबाबदार असतात. त्यामुळेच कर्तृत्ववान, यशस्वी (सक्सेसफुल), सर्वांगीण यश मिळविणारे लोक कधीही आध्यात्मिक कर्मांना म्हणजे कर्तव्यकर्मांना कमी लेखत नाहीत. कर्तव्यकर्मांकडे दुर्लक्ष करत नाही.''

कर्तव्यकर्मे जेव्हा इष्ट देवतेप्रती सेवाभावनेतून केली जातात तेव्हा ती आध्यात्मिक कर्मे होतात. सांसारिक जीवनात कर्तव्यकर्मे शुद्ध करण्याचा हा एकमेव उपाय आहे. या प्रकारे कर्म करण्याने आपला आपल्या आत्म्याशी व पर्यायाने आपल्या इष्ट देवतेशी संपर्क स्थापित होतो. व बाह्य जगातील कोणत्याही व्यक्तीपासून किंवा गोष्टींपासून सुख मिळण्याच्या आपल्या भावनेवर आपण अवलंबून राहत नाही. याप्रकारे, शुद्ध होणाऱ्या कर्तव्य कर्मांमुळे दैनंदिन जीवनातील इतर कर्मेसुद्धा आपोआप शुद्ध होऊ लागतात. त्यामुळे इष्ट (आराध्य, उपास्य) देवतेची सेवा म्हणून कर्तव्यकर्मे करणे ही भाग्योदयाची गुरुकिल्ली आहे.

**प्रश्न ३५ :** आपल्या व्यक्तित्वातील अहंकाररूपी शक्तीचे अस्तित्व कसे जाणावे ? त्याची स्वतःचीच स्वतःला अनुभूती कशी समजते ?

**उत्तर :** ईश्वराने या भौतिक विश्वाची रचनाच मुळी दोन विपरीत गुणांनी बनलेल्या विपरीत स्वभाव असलेल्या अहंकार नावाच्या शक्तीने केलेली आहे. त्यामुळे या सांसारिक जीवनातील कोणतीही जिवंत व्यक्ती, पशु, पक्षी, जीव-जंतू, जलचर या अहंकाररूपी शक्तीपासून मुक्त नाही. या अहंकाररूपी शक्तीनेच शरीर म्हणून वावरणाऱ्या सर्व आत्म्यांचे भौतिक अस्तित्व निर्माण होते व टिकूनही असते. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीत ती व्यक्ती जिवंत असेपर्यंत अहंकार असतोच. अशी ही दोन विपरीत गुणांनी बनलेली व त्यामुळे दुहेरी स्वभाव असलेली अहंकाररूपी शक्ती आमच्या आत्म्याद्वारे आमच्या इष्ट देवतेच्या नियंत्रणात सायकलच्या दोन वर-खाली होणाऱ्या पॅडल्स प्रमाणे कार्य करते, जीवनाला गती देत असते व त्यातूनच सांसारिक जीवनाचा प्रवास आपण करत असतो.

या अहंकाररूपी शक्तीची ओळख व जाणीव व्यक्तीच्या अस्तित्वातून, बाह्य वर्तनातून व त्याच्या कर्मांतून ६ प्रकारच्या दरवाज्यांतून बाहेर येते किंवा ६ प्रकारच्या खिडक्यांतून बाहेर डोकावते. ते ६ प्रकारचे दरवाजे किंवा ६ प्रकारच्या खिडक्या म्हणजे आमच्या व्यक्तीमत्वातील काम, क्रोध, लोभ, मोह, मद व मत्सर या मनातील भावना. यांना आपण षड्रिपु म्हणून संबोधितो. आपल्यातील भोगी वृत्ती अहंकाराचे प्रतीक म्हणून ओळखावी.

१) **कामरूपी अहंकार :** मनाला आकर्षित करणाऱ्या सर्व प्रकारच्या अति तीव्र भावना, चित्त व मन अशांत व असंतुलित करणारी, तसेच मनाला व्याकुळ करणारी बाह्य जगातील आकर्षणे.

उदाहरणार्थ : सत्ता, पैसे, संपत्ती, स्त्री, पुरुष बद्दलचे व्यक्तीला कर्म करण्यासाठी बाध्य करणारे तीव्र आकर्षण, पुरुषाला अस्थिर करणारे स्त्रीचे आकर्षण. तसेच सर्व प्रकारच्या मनाला अस्थिर करणाऱ्या गोष्टींची असहनीय तीव्र ओढ. इ. इ.

२) **क्रोधरूपी अहंकार :** उदाहरणार्थ : आपल्या मनासारखे झाले नाही तर इतरांवर, बाह्य गोष्टींवर येणारी चीड, संताप, क्षोभ. इ. इ.

३) **लोभरूपी अहंकार :** उदाहरणार्थ : मनात सत्ता, पैसा, स्त्री यांची मिळण्याची बेकायदेशीर, असंवैधानिक कामना येणे. इ. इ.

४) **मोहरूपी अहंकार :** उदाहरणार्थ : भौतिक सुमृद्धी, स्त्री, पुरुष, पैसा यांच्या बद्दलचे मनाला पडणारे तीव्र आकर्षण. इ. इ.

५) **मदरूपी अहंकार :** उदाहरणार्थ : आपल्या स्वतःला सुरक्षितता मिळाल्यावर त्या भावनेअंतर्गत इतरांना अपमानित करणे, इतरांना दुय्यम समजणे, इतरांना त्रास देणे, इतरांबद्दल सहानुभूती शून्य होणे. इ. इ.

६) **मत्सररूपी अहंकार :** उदाहरणार्थ : आपल्या जवळील व्यक्तीच्या गुणांची प्रशंसा झाल्यास व आपल्या जवळील व्यक्तीतील गुण पाहिल्यावर त्याच्याबद्दल कारण नसताना मनात खोलवर होणारी जळजळ, कुणाचे चांगले पाहून, इतरांचा आनंद पाहून उगाचच होणारी मनाची जळजळ, जळफळाट. दुसऱ्यांच्या गुणांची प्रशंसा झाल्यास उगाच मनाला होणारे क्लेश व येणारे वैचारिक व मानसिक असंतुलन.

इ.इ.

सांसारिक जीवनात अहंकाराच्या वरील सर्व ६ प्रकारच्या भावना व्यक्तीच्या कर्मांवर वाईट प्रभाव पाडतात व त्यामुळे अशा भावनेअंतर्गत कर्म केल्यास व्यक्तीचा अहंकार म्हणजे मी म्हणजे माझे शरीर, मी म्हणजे माझे मन, मी म्हणजे माझी बुद्धी, मी म्हणजे फक्त माझे वैयक्तिक सुख अशा भावना पुष्ट होतात व अंती अपयश, दुःख, मनःस्ताप, मानहानी वगैरे येते. त्या व्यक्तीची मी म्हणजे योगी ही भूमिका पूर्णपणे दुर्लक्षित होते.

सांसारिक जीवनातील सर्व प्रकारची आकर्षणे अहंकाराच्या शक्तीने निर्माण झालेली असतात म्हणूनच अहंकारी लोकांना त्यांची जास्त भुरळ पडते. परंतु, याला पर्याय नाही म्हणूनच सर्व प्रकारच्या आकर्षणांना योग्य प्रकारे हाताळणे महत्त्वाचे ठरते. त्यासाठी व्यक्तीतील दुसरी महत्त्वाची भुमिका : मी कोण? तर मी म्हणजे योगी या भावनेचा विकास करणे महत्त्वाचे ठरते.

**प्रश्न ३६ :** अहंकाररूपी शक्तीच्या घातक परिणामांपासून स्वतःला कसे म्रुत करावे? उपाय काय? व अहंकाररूपी शक्तीच्या घातक स्वरूपाचा सांसारिक जीवनाच्या सर्वांगीण विकासासाठी कसा उपयोग करावा?

**उत्तर :** उपाय :- कर्तव्यकर्मांची उपेक्षा करू नये व स्वतःची सर्वच कर्तव्यकर्मे आपल्या इष्ट देवतेप्रती सेवाभावनेतून सुरू करणे व स्वतःवर व इतरांवर सुद्धा तशी संस्कार करण्याची भूमिका ठेवणे. अहंकाररूपी शक्तीचा उपयोग करुन कर्तव्यकर्मे इष्ट देवतेची सेवा म्हणून केल्यास या शक्तीचे घातक स्वरूपाचे विधायक स्वरूपात रूपांतर होते हे निर्विवाद सत्य आहे.

मी म्हणजे योगी अशा भावनेतून कर्म करणे चालू केल्यास सर्वसाधारणपणे षड्रिपू म्हणून वाईट समजली जाणारी अहंकाराची रूपे जी काम, क्रोध, लोभ, मोह, मद व मत्सर या नावाने ओळखली जातात ती सांसारिक जीवनात सुख, यश, सर्वांगीण विकास साध्य करण्यास मदतगारच ठरतात. त्याच्या घातक स्वरूपाचा फायदाच होतो.

**प्रश्न ३७ :** सुख म्हणजे नक्की काय? राजयोग साधनेशी त्याचा संबंध काय?

**उत्तर :** ही एक अतिशय सूक्ष्म आनंददायक भावना आहे, जी आत्म्याचा स्वभाव आहे. या भावनेअंतर्गत काही वेळ आपण आपले अस्तित्व विसरतो.

आपले देहभान निघून जाते. अहंकाराचा शरीर, मन व बुद्धी यांवरील प्रभाव निघून जातो. मनावरील सर्व ताणतणाव निघून जातात. अशी स्थिती व्यक्तीला त्याच्या आत्म्याची जाणीव, अनुभूती देते. सर्व प्रकारच्या सांसारिक आकर्षणांतून हीच अनुभूती मिळते, म्हणूनच प्रत्येक व्यक्ती विविध सांसारिक आकर्षणांच्या आड मध्ये सुखाच्या प्राप्तीसाठी विविध कर्मे करत असते. सुखाची जाणीव नेहमीच आत्म्याच्या पातळीवर असल्यामुळे अनुभवता येते, पण शब्दात स्पष्ट करता येत नाही.

हे विसरता कामा नये की, सुखाच्या अनुभूतीचा एकमेव स्रोत म्हणजे ईश्वर म्हणजेच सांसारिक जीवनातील व्यक्तीची इष्ट (उपास्य, आराध्य) देवता आहे. त्याचमुळे इष्ट देवतेशी संपर्क स्थापित करण्याची शिकवण महत्त्वाची ठरते. राजयोग साधना नेमके हेच शिकविते.

**नोट :** शांत झोपेतही सुखाची अनुभूती येते परंतु झोपेत शरीर, मन, बुद्धी व स्मृती कार्यरत नसतात म्हणून कर्म करता येत नाही. सांसारिक जीवनात सर्वांगीण विकास होण्यासाठी कर्म करण्यास पर्याय नसल्यामुळे झोपेत मिळणाऱ्या सुखातून जीवनाचा विकास करता येत नाही. राजयोग साधनेत कर्म करण्यासाठी शरीर, मन, बुद्धी व स्मृती यांचा वापर होत असताना सुखाची अनुभूती मिळते हे विशेष.

**सांसारिक सुखांच्या मर्यादा :** सत्य असे आहे की, या भौतिक जगातील सर्व प्रकारची भौतिक सुखे फक्त काही मर्यादित वेळेपर्यंतच सुखाची अनुभूती देतात. देऊ शकतात. एका विशिष्ट मर्यादेनंतर त्यांच्यापासून मिळणाऱ्या सुखांची अनुभूती व आकर्षण निघून जाते व त्यांच्या सेवनात शुद्ध दृष्टिकोन विकसित केला नाही, म्हणजेच कर्तव्यबोध व सेवाभाव विकसित केला नाही किंवा जागृत करून घेतला नाही तर त्या भौतिक सुखांचे दुष्परिणाम पण जाणवू लागतात व त्यांच्यापासून येणारे दुःख भोगावे लागते.

**प्रश्न ३८ :** श्रीमद्‌भगवद्‌गीतेत भगवान श्रीकृष्णांनी अहंकार ही त्यांची भौतिक शक्ती आहे व ती मानवी अस्तित्वाची व भौतिक विश्वाची मुलभूत ऊर्जा शक्ती आहे हे स्पष्टपणे सांगितले आहे. असे असताना इंग्रजी भाषेतील इगोलेसनेस (अहंकार नसणेच किंवा अहंकारशुन्यता ) हा शब्द आध्यात्मिक अभ्यासात कसा प्रचलित झाला ? व त्यामुळे सर्वसामान्य लोकांचे काय नुकसान झाले ?

**उत्तर :** इंग्रजी भाषेत अहंकार या शब्दाचा अनुवाद इगो असा आहे. गीतेच्या पाश्च्यात्त्य भाषांतरकारांनी अहंकाररहित कर्म करण्याचा अर्थ इगोलेसनेस कर्म करणे असा केला व त्यामुळे श्रीमद्‌भगवद्‌गीतेतील भगवान श्रीकृष्णांना अभिप्रेत असलेली अहंकाररहित कर्म करण्याची संकल्पनाच अस्पष्ट राहिली. त्या इंग्रजी स्क्रिप्टचे पुढे भारतीय भाषेत अनुवाद झाले. अशाप्रकारे इगोलेसनेस किंवा अहंकार शून्यता हे शब्द प्रचलित झाले.

संस्कृत भाषेच्या तुलनेत इंग्रजी भाषेला काही मर्यादा असल्यामुळे व पाश्चात्त्यांना आत्मा ही संकल्पना पूर्णपणे नवीन असल्यामुळे शरीर रूपातील आत्म्याची 'शरीरातील योगी (ईश्वराचा प्रतिनिधी)' या भूमिकेचा व्यावहारिक उपयोग त्यांच्याकडून दुर्लक्षिला गेला. त्यांच्या आकलनात आला नाही. त्यामुळे त्यांच्याकडून शरीरातील अहंकार नावाच्या मूलभूत शक्तीला स्थूल स्वरूप दिले गेले व त्यामुळे मानवी शरीरात अहंकाराच्या विपरीत असलेल्या भूमिकेला इगोलेसनेस असा भाव देणे त्यांना जास्त सयुक्तिक वाटले.

भगवद्‌गीतेप्रमाणे मानवी शरीरात अहंकार आणि योगी या एकाच आत्म्याच्या दोन विपरीत स्वभावाच्या भूमिका आहेत. आत्म्याचे ज्ञान नसलेल्यांना शरीरातील आत्म्याची मी कोण? तर मी म्हणजे योगी ही भूमिका आकलन होणे शक्य नसते. त्यामुळे आत्म्याच्या योगी या भूमिकेला इगोलेसनेस म्हणजे अहंकारशून्यता असा अर्थ दिला गेला व तोच अर्थ सर्वदूर प्रचलित झाला. येथेच घोळ झाला.

श्रीमद्‌भगवद्‌गीतेचा अभ्यास केल्यावर लक्षात येते की, भगवंतांना व्यावहारिक जगात कर्म करताना अहंकाराचा अभाव किंवा इगो नसणे असा मुळीच नाही. बोलीभाषेत अहंकाराने कर्म करू नये याचा आशय स्वतःचे कर्म केवळ स्वतःच्याच शारीरिक व मानसिक सुखांसाठी करू नये असा आहे.

अहंकाराचा अभाव किंवा अहंकारशून्यता याचा व्यावहारिक अर्थ म्हणजे; आत्म्याच्या योगी या भावनेचा उपयोग करत कर्म करणे असा आहे. अहंकार ही मानवी शरीर, मन, बुद्धी व स्मृतीची तसेच भौतिक विश्वाची मुळ शक्ती असल्यामुळे सांसारिक कर्मे करण्यासाठी ही शक्ती एक महत्त्वाचा घटक आहे. हे सत्य सर्वश्रुत असल्यामुळे सर्वसामान्य लोकांनासुद्धा अहंकाररहित होता येणे

शक्यच नाही हे माहीत होते व समजतही होते.

त्यामुळे भगवद्‌गीतेची व्यावहारिक उपयुक्तता समजण्यासाठी अहंकाराचा त्याग करा किंवा आपला अहंकार शुन्य करा किंवा इगोलेस व्हा असे कोणी सांगितले; तर ते पूर्वीच्या काळीही सर्वसामान्य लोकांना व्यावहारिक वाटले नाही; आजही ते व्यावहारिक वाटत नाही.

अशा परिस्थितीत अहंकाराची संकल्पना व वास्तविकता न समजल्यामुळे भगवद्‌गीता समजणे शक्यच नव्हते. त्यामुळे ती पूर्णपणे दुर्लक्षिली गेली. त्यामुळे आध्यात्मिक अभ्यासाबद्दलची सर्वसामान्य लोकांची रुची, आस्था सुद्धा लुप्त झाली.

'राजयोग साधनेतील स्वधर्माप्रमाणे कर्तव्य कर्म ईश्वराची सेवा म्हणून करणे' हे सूत्र व्यक्तीच्या शरीरात मी कोण? तर मी म्हणजे योगी (आत्मा) ही भावना विकसित करते व स्थिर पण करते. या भूमिकेत शरीरातील आत्म्याची पहिली भूमिका मी कोण? तर मी म्हणजे माझे शरीर, मी म्हणजे माझा अहंकार ही भूमिका सायलेंट होते. शरीरातील आत्म्याच्या मी म्हणजे योगी (आत्मा) या भावनेच्या नियंत्रणात अहंकाराची शक्ती कार्यरत राहते. यालाच सर्वसाधारणपणे इगोलेस कर्म किंवा अहंकारशून्यता असे संबोधिले जाते''.

**प्रश्न ३९ :** आध्यात्मिक विषय समजून घेण्यासाठी व ईश्वराची अनुभूती येण्यासाठी इगोलेस असावे लागते व ईश्वराप्रती सरेंडर (शरणागत) ॲटीट्यूड असावा लागतो अशी सर्वसामान्य धारणा आहे. यात कितपत सत्य आहे?

**उत्तर :** भगवद्‌गीतेत इगोलेसनेस तसेच ईश्वरापुढे सरेंडर करणे अशा काहीही संकल्पना नाहीत. चुकीच्या इंग्रजी अनुवादामुळे ते शब्द प्रचलित झाले आहेत. राजयोग पुस्तकात ते दर्शविले आहे व बरोबर काय हे पण सांगितले आहे.

**प्रश्न ४० :** सांसारिक जीवनात अनेक प्रकारच्या चांगल्या-वाईट व्यक्तींबरोबर काम करावे लागते, वेगवेगळी परिस्थिती हाताळावी लागते व कर्म करावे लागते. त्यासाठी इगो असणे व कठोरता असणे आवश्यक असते. त्यामुळे इगोलेस (अहंकाराच्या अभावाशिवाय किंवा अहंकार शुन्यतेतून) व सदा विनम्रतेच्या भावनेत कर्मे करणे कसे शक्य आहे ?

**उत्तर :** सांसारिक जीवनात अहंकार शुन्यतेची व सदा विनम्र भावात म्हणजे

सरेंडर मोडमध्ये कर्म करण्याची मुळीच आवश्यकता नाही. ते चुकीचेच आहे व शक्यही नाही. राजयोग पुस्तकात ते स्पष्ट केले आहे व त्याच बरोबर योग्य कर्म करण्याची पद्धत पण दर्शविली आहे.

**प्रश्न ४१ :** श्रीमद्‌भगवद्‌गीतेतील संस्कृत शब्द 'शरणम्' चा प्रथम इंग्रजीमध्ये सरेंडर व नंतर सरेंडर पासून शरणागती असा अनुवाद केला गेल्यामुळे व तो तसाच प्रचलित झाल्यामुळे सर्वसाधारण सांसारिक जीवन जगणाऱ्यांचे गीतेचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने काय नुकसान झाले ?

**उत्तर :** पाश्चात्त्य तत्त्ववेत्त्यांना आत्मा व परमात्मा यांमधील नात्याची जाणीव नसल्यामुळे त्यांनी शरणम्‌चा इंग्रजी अनुवाद सरेंडर असा केला गेला. या सरेंडर शब्दाचाच परत भारतीय भाषांत गीतेचा अनुवाद करताना शरणागती असा अनुवाद झाला. गीतेत 'शरणम्' चा अर्थ समर्पण असा अभिप्रेत आहे.

गीतेतील 'शरणम्' शब्दाचा आशय ईश्वराप्रती समर्पण भावनेतून संबंध प्रस्थापित करणे असा आहे. कारण समर्पणाशिवाय ईश्वराशी संबंध स्थापित होऊच शकत नाही. समर्पण हे फक्त व्यक्तिगत स्वतंत्रतेतूनच शक्य असते. उदाहरणार्थ शरीराचे विविध अवयव शरीराशी समर्पित भावनेनेच संबध ठेवू शकतात. समर्पण प्रेम, आस्था व आदर या गोष्टी आत्म्याच्या योगी या भूमिकेतील भावनेमधूनच शक्य होतात. त्यामुळे भगवद्‌गीतेत भगवान श्रीकृष्णांनी योगी बनण्यासाठीचे आवश्यक ज्ञान अर्जुनाला दिलेले आहे.

आत्मा हा ईश्वराचा अंश असल्यामुळे ईश्वराचा आत्म्याशी आई-वडील व त्यांचे अपत्य असा संबंध असतो. दोघांतील नाते प्रेम, आस्था व आदर या भावनांवर आधारित असते. त्यामुळे त्यांच्यातील नाते समर्पणातूनच जोडले जाऊ शकते. समर्पणात केवळ आत्म्याच्या प्रेम, आस्था व आदर या भावना कार्यरत असतात.

उलटपक्षी शरणागती शत्रूपुढे हार झाल्यामुळे शरीर व शरीराच्या संबंधातील भौतिक गोष्टींचे नुकसान वाचविण्यासाठी केली जाते. शरणागतीत पराभवाची भावना कार्यरत असते. आत्मा ईश्वराच्याच अंश असल्यामुळे आत्म्याचा पराभव व्हावा व आत्म्याने ईश्वरापुढे शरणागती पत्करावी असे ईश्वराला मुळीच वाटत नाही किंबहुना आत्मा या भौतिक जगात कायम विजयी व्हावा व सुखी रहावा असेच ईश्वराचे नियोजन असते.

‘‘संस्कृत भाषेमधील ‘शरणम्’ चा इंग्रजी अनुवाद सरेंडर व त्याचा पुढे भारतीय भाषांत शरणागती असा अनुवाद प्रचलित झाल्यामुळे गीतेतील मुख्य विषय म्हणजे आत्मा व परमात्मा यांच्या नात्यातील प्रेम, आस्था, आदर अशा गोष्टीची जाणीव जागृत करण्याचा गीतेचा उद्देशच बाधित झाला व त्यामुळे गीता क्लिष्ट वाटू लागली. व सर्वसाधारण लोकांना आवडेनाशी झाली. त्यामुळे गीतेच्या व्यावहारिक ज्ञानाचा त्यांना उपयोगच लक्षात आला नाही. अहंकाराची शक्ती कधीही शरणागती पत्करू शकत नाही. झुकणे हा तिचा स्वभावच नाही’’.

राजयोग साधनेतील ‘इष्टदेवतेप्रती सेवाभाव’ व्यक्तीमध्ये ईश्वराप्रती प्रेम, आस्था, आदर व समर्पणाची भावना विकसित करते, ती भावना स्थिर करते व तिचे नियंत्रण पण शिकविते. यालाच सर्वसाधारणपणे ईश्वरासमोर सरेंडर करणे असे संबोधिले जाते.

**प्रश्न ४२ :** गीतेत भगवान श्रीकृष्णांना अहंकार ही एक शक्ती आहे हे सांगून व शरणम् या शब्दाचा उपयोग करून मानवासाठी काय निर्देशन करावयाचे आहे?

**उत्तर :** भगवान श्रीकृष्णांना सांगावयाचे आहे की; सांसारिक जीवनात सुख व प्रगतीसाठी अहंकाराच्या शक्तीचा विधायक उपयोग करावयास शिकणे महत्त्वाचे असते. म्हणजे कर्म करताना शरीरातील आत्म्याच्या योगी या भूमिकेला प्राधान्य दिले पाहिजे. शरणम् शब्दाद्वारे श्रीकृष्णांनी स्पष्ट केले आहे की, ईश्वराच्या प्रती समर्पित भाव जागृत करून कर्तव्यकर्मे करणे सांसारिक जीवनात सुख व प्रगतीची खात्री देते. राजयोग साधना नेमके हेच करविते.

**प्रश्न ४३** : अहंकाराची ६ रूपे : काम, क्रोध, लोभ, मोह, मद व मत्सर विविध लोकांमध्ये कसे काम करतात?

**उत्तर** : सत्त्वगुणी लोकांमध्ये लोभ व मोह या भावना बलवान असतात. रजोगुणी लोकांमध्ये काम व क्रोध या भावना प्रबळ असतात व तमोगुणी लोकांमध्ये मद व मत्सर या भावना प्रबळ असतात.

**प्रश्न ४४ :** पुस्तकात दाखविलेल्या चक्रांचा अहंकाराची ६ रूपे: काम, क्रोध, लोभ, मोह, मद व मत्सर यांच्याशी काय संबंध आहे ?

**उत्तर :** चक्र १ व ३ प्रमाणे कर्तव्य कर्मे चालू केल्यास अहंकाराच्या काम व क्रोध या भावनांवर नियंत्रण येते व त्या भावना सांसारिक जीवनात विधायक रूप घेतात.




संदर्भ पृष्ठ : ५९, ६० व ६१ वरील चक्र १ व ३ चे विवरण वाचावे. तक्ता क्र. २, तक्ता क्र. ३ व तक्ता क्र.४ मधील संबंधीत चक्रे अभ्यासावीत.
(भगवद्गीता अध्याय २ः श्लोक ४७ व अध्याय ९ः श्लोक २७)

स्वधर्म समजून <u>चक्र २ व ३</u> प्रमाणे कर्तव्यकर्मे केल्यास अहंकाराच्या लोभ व मोह, या भावनांवर नियंत्रण येते व त्या भावना सांसारिक जीवनात विधायक रूप घेतात. संदर्भ पृष्ठ : ५९, ६० व ६१ वरील चक्र २ व ३ चे विवरण वाचावे.

तक्ता क्र. २, ते तक्ता क्र. ८ मधील संबंधीत चक्रे अभ्यासावीत. (भगवद्गीता अध्याय २ : श्लोक ३१, अध्याय ७ : श्लोक ४, अध्याय ९ : श्लोक ३४, अध्याय १० : श्लोक ८ व अध्याय ११ : श्लोक १५)

<u>चक्र ३ व चक्र ४</u> यांप्रमाणे सवयी लावून घेतल्यास अहंकाराच्या मद व मत्सर, या भावनांवर नियंत्रण येते व त्या भावना सांसारिक जीवनात विधायक रूप घेतात. संदर्भ पृष्ठ : ६१ व ६२ वरील चक्र ४ चे विवरण वाचावे. तक्ता क्र. २, तक्ता क्र. ३ व तक्ता क्र. ४ मधील संबंधीत चक्र अभ्यासावे. (भगवद्गीता अध्याय १० : श्लोक १० व ११).

<u>चक्र ५ अहंकाराच्या</u> : काम, क्रोध, लोभ, मोह, मद, व मत्सर या सर्वच भावनांचे गतिशील नियंत्रण (डॉयनामिक बॅलेंसींग) करते. राजयोग साधनेला गती

देते व अखंडता देते. संदर्भ पृष्ठ : ६३ वरील चक्र ५ चे विवरण वाचावे.

तक्ता क्र. २, तक्ता क्र. ३ व तक्ता क्र.४ मधील संबंधीत चक्र अभ्यासावे. (भगवद्‌गीता अध्याय १८ : श्लोक ६६ )

❖ चक्र १ व चक्र ३ तसेच चक्र २ व चक्र ३ ची जागृती होऊ लागल्यास व्यक्तीतील अहंकाराच्या काम, क्रोध, लोभ व मोह या भावना नियंत्रणात येतात व त्यांना विधायक रूप मिळू लागते. त्याच बरोबर चक्र ६ व चक्र ७ ची अनुभूती मिळणे चालू होते व अशी व्यक्ती चक्र ४ च्या साधनेत स्थिर होऊ लागते. चक्र ४ ची साधना व्यक्तीतील अहंकाराच्या मद व मत्सर या भावना नियंत्रणात आणते व त्यांना विधायक स्वरूप प्राप्त करून देते. व त्याच बरोबर अशी व्यक्ती चक्र ५ च्या साधनेत स्थिर होऊ लागते. चक्र ५ ची साधना महापुरुषांच्या, श्रेष्ठ व्यक्तींच्या जीवनाचा मुख्य भाग असतो. अशी साधना त्यांच्यावरील ईश्वराची कृपा असते. (भगवद्‌गीता अध्याय ९ : श्लोक २२ व ३१, अध्याय १८ : श्लोक ७८).

❖ **सूचना :** सांसारिक जीवनात या ६ ही भावना नष्ट करता येणे शक्य नसते. त्यांना विधायक रूप देणे शिकावे लागते. व्यक्तीची इष्ट देवता नेमके हेच करवून घेते. तक्ता क्रमांक २ ते तक्ता क्रमांक ८ चा अभ्यास केल्यास अहंकारच्या काम, क्रोध, लोभ, मोह, मद व मत्सर या सर्व भावनांचे सांसारिक जीवनातील कर्म करण्यासाठीचे विधायक स्वरूप समजून येते.

**प्रश्न ४५** : भक्तियुक्त कर्मयोगी तमोगुण, रजोगुण व सत्त्वगुणांत कर्म करत असलेल्या लोकांशी कसे वागतात?

**उत्तर** : सांसारिक जीवनात सर्वसाधारणपणे लोक सत्त्वगुणी, रजोगुणी व तमोगुणी यांपैकी त्यांच्या मनाच्या कोणत्यातरी एका भावनेत स्थिर असतात व ती भावना त्या व्यक्तीच्या आवडी-निवडी व त्याची कर्मे करण्याची पद्धत नियंत्रित करते.

सत्त्वगुणी व्यक्ती क्रिएटिव्ह लाईफ जगण्याला जास्त महत्त्व देतात. तमोगुणी व्यक्ती नार्सिस्टिक लाईफ जगण्याला जास्त महत्त्व देतात व रजोगुणी लोक स्वतःच्या सुखासाठी या दोघांपैकी जो कोणी त्यांची सुखे उपलब्ध करून देईल त्यांना मदत करतात. त्यांना त्यांच्या स्वतःच्या सुखात कमतरता आलेली नको असते.

भक्तियुक्त कर्मयोगी ईश्वराकडून मिळणाऱ्या योगमाया शक्तीच्या आधाराने स्वतःची कर्तव्य कर्मे करत असतो; त्यामुळे या तिन्ही प्रकारे कर्म करणाऱ्या लोकांना त्याला नियंत्रित करता येते व त्यामुळे तिन्ही प्रकारच्या लोकांची त्याला मदत घेता येते.

**प्रश्न ४६ :** आपला अहंकार म्हणजेच आत्म्याची शरीरातील पहिली भूमिका : मी कोण ? तर मी म्हणजे माझा अहंकार (शरीर) ही भूमिका आत्म्याची शरीरातील : मी कोण? तर मी म्हणजे योगी (आत्मा). या दुसऱ्या भूमिकेच्या नियंत्रणात आहे किंवा नाही हे कसे ओळखावे ? सांसारिक जीवनात त्याची लक्षणे काय व फायदा काय होतो?

**उत्तर :** आपल्या आत्म्याची शरीरातील पहिली भूमिका म्हणजे आपला अहंकार! या भूमिकेची जाणीव आपण अहंकाराच्या ६ रूपांमध्ये काम, क्रोध,लोभ, मोह, मद व मत्सर या मनातील भावनांच्याद्वारे दैनंदिन जीवनात घेत असतो! चक्र ४ चा अभ्यास व साधना करताना याची प्रचिती येते व शरीरातील आत्माच्या दोन्ही भूमिका स्वतःच्याच स्वतःला स्पष्ट होतात.

सामान्य जीवनात आपण आपल्या जवळील व्यक्तींची त्यांच्या गुणांसाठी समयोचित उत्स्फूर्तपणे सरळ प्रशंसा करू शकत असलो किंवा आपल्यात त्यांना शक्य ती मदत करू शकण्याची भावना असेल तर समजावे की आपला अहंकार आपल्या आत्म्याच्या नियंत्रणात आहे.

सामान्य जीवनात आमच्या जवळच्याच लोकांकडूनच कळत-नकळत आमचा अहंकार दुखावला जात असतो, दुखावला गेलेला असतो व ते सतत होत असते. त्यामुळे चक्र ४ ची साधना अवघड वाटते. परंतु, चक्र १,२ व ३ ची साधना सुरू असल्यास चक्र ४ ची साधना सोपी होते व जीवनाचे खरे फायदे येथून येतात.

लक्षात ठेवावे की,कोणत्याही अपेक्षेविना प्रशंसा करता येणे किंवा मदत करण्याची भावना असणे हा आत्म्याच्या योगी या भावनेचा नैसर्गिकभाव व स्वभाव असल्यामुळे ते केवळ आत्म्याचा शरीरातील : मी म्हणजे योगी या भूमिकेतूनच शक्य असते. अहंकाराच्या शक्तीला नियंत्रित करून तिला सहाय्यक केल्याशिवाय आत्म्याला त्याची योगी ही भूमिका स्पष्ट करणे किंवा जगणे शक्य नसते.

ज्या व्यक्तीची शरीरातील आत्म्याची पहिली भूमिका : मी कोण? तर मी म्हणजे अहंकार, मी म्हणजे माझे सुख, मी म्हणजे माझे मन, मी म्हणजे माझी बुद्धी–माझे ज्ञान, माझे कर्तृत्व अशा भावना. आत्म्याची शरीरातील दुसरी भूमिका : मी कोण? तर मी म्हणजे, मी म्हणजे योगी (आत्मा), मी म्हणजे ईश्वराचा सेवक–प्रतिनिधी. या दुसऱ्या भूमिकेतील भावनांच्या नियंत्रणात असतात त्यांना त्यांच्या संपर्कात येणाऱ्या लोकांमधील गुणांची ओळख पटकन होते व त्यांची सरळ प्रशंसा करण्यात त्रास होत नाही, उलट आनंद होतो. कारण की, अशी उत्स्फूर्त क्रिया मुळात आत्म्याच्या रूपातील आपल्या इष्ट (आराध्य, उपास्य) देवतेचीच प्रशंसा असते. अशा व्यक्ती आपल्याला न आवडणाऱ्या किंवा आपल्या शत्रूंच्या गुणांचे व अवगुणांचे योग्य मूल्यमापन करू शकतात. त्यांच्यातील या गुणवत्तेमुळे त्यांना इतरांच्या गुणांचा व अवगुणांचा सुद्धा स्वतःतील गुण विकसित करण्यात व अवगुण कमी करण्यात उपयोग होतो. त्यादृष्टीने ज्ञान होते. हा फायदा असतो.

लक्षात ठेवावे की, पुस्तकात दर्शविलेल्या चक्र ४ ची साधना म्हणजे दैनंदिन जीवनात समयोचित व आडपडदा न ठेवता आपल्या जवळील व्यक्तीची त्याने किंवा तिने मिळविलेले यश, आपल्याला दिसलेले गुण यांची अपेक्षारहित प्रशंसा, तारीफ करण्याची सवय लावून घेणे. असे केल्याने आपल्यातील : मी कोण? तर मी म्हणजे योगी ही भूमिका विकसित होते व सुदृढ पण होते. सांसारिक जीवनात सुख व यश मिळण्यात हीच भूमिका महत्त्वाची असते. अहंकाराची केवळ सहाय्यकाची भूमिका असते.

**प्रश्न ४७ :** सांसारिक जीवनात आत्मा 'मी म्हणजे माझा अहंकार, मी म्हणजे माझेच सुख, मी म्हणजे माझेच मन, माझे यश, माझी सत्ता, माझेच ज्ञान' अशा भावनेत कसा गुंतून राहतो? स्वतःचे आध्यात्मिक स्वरूप विसरण्याची ही गडबड कशी होते?

**उत्तर :** सांसारिक जगात शरीराच्या रूपात वावरणारा आत्मा सर्वप्रथम विपरीत स्वभावाच्या अति सूक्ष्म अशा अहंकाररूपी शक्तीची निर्मिती करतो व त्याच्या उपयोगातूनच शरीर, पंच इंद्रिये, मन व बुद्धी यांच्याबरोबर शरीरातील इतर सर्व गोष्टीची निर्मिती करतो. त्या सर्व गोष्टी आत्म्याचीच निर्मिती असल्यामुळे व

त्या सर्वांच्या निर्मितीपासून सतत त्यांच्या सहवासातच राहत असल्यामुळे आत्मा नकळत त्यांच्या प्रेमात गुरफटत जातो व त्यांच्या आवडीप्रमाणे कर्म करू लागतो. शरीर, पंच इंद्रिये, मन, बुद्धी हे सर्व अहंकाराच्या विपरीत गुणशक्तीतून निर्माण झालेले असल्यामुळे त्यांच्याद्वारे व त्यांच्या आवडीनुसार केलेली कर्मे नेहमीच मिश्र फळे देतात. त्यामुळे कर्म कायद्यांच्या नियमानुसार आत्मा त्यांच्या वापरातून येणाऱ्या चांगल्या व वाईट कर्मफळांमध्ये किंवा त्यांच्या परिणामांमध्ये अडकतो. मग आत्म्याचे स्वतःच्या आध्यात्मिक स्वरूपाकडे दुर्लक्ष होते. येथेच गडबड सुरू होते व योग्य मार्गदर्शन मिळाले नाही; तर आत्मा स्वतःचे आध्यात्मिक स्वरूप पूर्णपणे विसरतो व आपल्या अहंकाराच्या भूमिकेतून कर्म करू लागतो.

**प्रश्न ४८ :** शरीर, मन, बुद्धी व अहंकार याचा परस्पर संबंध काय? राजयोग साधनेत त्याचे महत्त्व काय ?

**उत्तर :** शरीराचा अदृश्य भाग म्हणजे व्यक्तीचे मन होय. तसेच मनाचा दृश्य भाग म्हणजे शरीर होय. दैनंदिन जीवनात अहंकाराची शक्ती मुख्यतः दृश्य कर्म केवळ या दोघांच्या साहाय्यानेच करत असते. बुद्धी बरोबर असते, परंतु बुद्धीला स्वतःचा असा कोणताही विशिष्ट उद्देश नसतो. कर्म करण्यात बुद्धीची भूमिका नेहमीच निष्क्रिय (पॅसिव्ह) व सहाय्यकाची असते.

राजयोग साधनेप्रमाणे प्रथम शरीराने कर्मे इष्ट देवतेसाठी सेवाभावनेने केल्यास मन नियंत्रित होते व मनातील अहंकाराच्या सर्व ६ भावना शुद्ध होऊ लागतात म्हणजे त्यांचे विधायक स्वरूप स्पष्ट होऊ लागते व मन व्यक्तीचे मित्र बनते.

व्यक्तींकडून अहंकाराच्या शक्तीने कर्म होण्यासाठी शरीर व मन यांची व्यक्तीच्या दोन पायांसारखी भूमिका असते. राजयोग साधना ईश्वराप्रती सेवाभावनेने कर्म करून मनाचे नियंत्रण व शुद्धीकरण करण्यावर भर देते.

**प्रश्न ४९ :** आपले मन आपले मित्र किंवा शत्रू कसे बनते व त्याचा काय परिणाम येतो?

**उत्तर :** कर्तव्यकर्मे इष्ट देवतेप्रती सेवाभावनेतून करणे चालू केल्यास इष्ट देवतेकडून मिळणाऱ्या शक्तीमुळे व्यक्तीचे मन त्याचे मित्र बनते. सांसारिक जीवनात यश मिळण्यात मित्र झालेल्या मनाची महत्त्वाची भूमिका असते.

याउलट केवळ स्वतःच्या सुखासाठी कर्मे केल्याने व्यक्तीचे मन ईश्वराच्या मायाशक्तीच्या प्रभावात जाते व त्यामुळे व्यक्तीचे मन त्याला कर्तव्यकर्म करू देत नाही. मायेच्या अधीन कर्म करण्यास प्रवृत्त करणारे मन सांसारिक जीवनात व्यक्तिला अंततः मनःस्ताप, अपयश, दुःख, मानहानी वगैरे वगैरे मिळण्यात कारणीभूत ठरते व त्याअर्थाने व्यक्तीच्या शत्रूची भूमिका बजावते.

**प्रश्न ५० :** या पुस्तकात राजयोग साधनेस व त्यामुळे राजयोग साधकांस इष्ट देवतेकडून सहजपणे मिळणाऱ्या दोन वरदानांचा दैनंदिन जीवनात कसा उपयोग होतो? त्याचे महत्त्व काय?

**उत्तर :** राजयोग साधना व्यक्तीच्या इष्ट (उपास्य, आराध्य) देवतेकडून संरक्षित असलेली अशी योगसाधना आहे. त्यामुळे राजयोग साधक सुद्धा संरक्षित असतो व साधनेच्या प्रभावामुळे अशा साधकांचा विचार व कृतींच्या बाबतीत दर्जा सतत उंचावत असतो. पुस्तकात स्पष्ट केल्याप्रमाणे ही साधना अंगीकारणाऱ्यांना वेळ व काळानूसार योग्य अनुकूलता करून देण्याची, त्यांना आवश्यक बळ व ज्ञान उपलब्ध करून देण्याची जबाबदारी ईश्वराने स्वतःकडे घेतलेली आहे. त्यामुळे राजयोग साधकाच्या उपयोगी पडणारे सर्व लोक, त्याच्या जवळील लोक स्वतःसाधक असतीलच असे नाही, ते लोक त्याचे शत्रू किंवा विरोधक असले तरी साधकासाठी ते पोषकच असते. वेळ व काळानुसार त्यांच्याकडून साधकाच्या योगसाधनेस अनुकूल भूमिका बजावली जाईल अशी परिस्थिती निर्माण होत राहणे हा भक्तियुक्त कर्मयोग (राजयोग) साधनेचा अंतर्निहित परिणाम व मोडस् ऑपरेंडी (कार्यप्रणाली) आहे. राजयोग साधनेतील दोन्ही वरदानांचा हाच एकत्रित परिणाम आहे.

त्याचप्रमाणे दैनंदिन जीवनात भक्तियुक्त कर्मयोग साधनेद्वारे सर्व प्रकारच्या अनुकूल व प्रतिकूल परिस्थितीत सेल्फ ट्रान्सफार्मेशन कसे घडून येते व हे होत असताना ईश्वराच्या दोन्ही वरदानांच्या प्रभावामुळे सर्व कसे सांभाळले जाते याचा स्वतः अनुभव घेण्याचे प्रात्यक्षिक म्हणून पण ही योगसाधना महत्त्वाची आहे.

राजयोग साधना साधकातील नैसर्गिक भोगीवृत्ती (अहंकार) नियंत्रणात आणते, नियंत्रणात ठेवते व साधकाच्या सांसारिक जीवनात त्याच्यातील असलेल्या नैसर्गिक भोगीवृत्तीचा विधायक उपयोग पण त्याच्याकडून करून घेते.

**प्रश्न ५१ :** तरुण पिढीचा श्रीमद्‌भगवद्‌गीता, वाल्मिकी रामायण, भावार्थ दीपिका–ज्ञानेश्वरी अशा आध्यात्मिक ग्रंथांकडे कल का जात नाही? तरुण पिढीला आध्यात्मिक गोष्टींचे मुळीच महत्त्व वाटत नाही याचे काय कारण समजावे? उपाय काय आहे ?

**उत्तर :** त्यात त्यांची काही चूक नाही. सांसारिक जीवनातील तरुण पिढीचा त्यांना ज्या गोष्टींमधून त्यांच्या भौतिक जीवनातील यश, सुख, समृद्धी मिळण्याची खात्री वाटते त्या गोष्टींवरच विश्वास असतो व विश्वास बसतो. ते त्यांच्या बाबतीत नैसर्गिकच आहे व योग्य पण आहे.

विद्यार्थी दशेतील व तरुण पिढीतील लोकांना आमची व आमच्या मागील अनेक पिढ्यातील जेष्ठ, ज्ञानी, सामर्थ्यवान लोक सांसारिक जीवनात सर्व प्रकारची भौतिक समृद्धी श्रीमद्‌भगवदगीता, रामायण व ज्ञानेश्वरी यांच्या नेमक्या (सटीक) उपयोगातून प्राप्त होऊ शकते याची खात्री व अनुभूती देऊ शकण्यास असमर्थ राहिल्या आहेत.

सर्व ऋषींचा त्या ग्रंथांच्या माध्यमाने सामान्य जीवनात सनातन धर्माची मूळ शिकवण स्वतःमध्ये, लहान मुलांमध्ये व इतरांमध्ये संस्कारित व्हावी हा उद्देश होता.

‘‘सर्वसामान्य लोकांसाठी भौतिक यश व ज्ञानी लोकांसाठी भौतिक यशाबरोबर ईश्वराचे ज्ञान असे दोन्ही उद्देश या ग्रंथांच्या अभ्यासाने साध्य होतात.’’

अनेक शतकांपासून सनातन धर्माची मूळ शिकवण पारिवारिक आयुष्यात सर्वांगीण यश, पैसे, संपत्ती मिळवता येण्याचे सर्वात सोपे साधन आहे याचे ज्ञान लुप्त राहिले आहे. त्यामुळे आमच्या तसेच आमच्या आधीच्या पिढीतील लोकांमध्ये पण ते ज्ञान लुप्त राहिले.

पूर्वीच्या काळी सत्ताधारी व ज्ञानी लोकांनी या ग्रंथांच्या मूळ उद्देशाकडे केलेले दुर्लक्ष, परकीय आक्रमणे, गुलामगिरी यांच्या प्रभावामुळे तसे झाले. त्याचा तो नैसर्गिक परिणाम आहे.

**उपाय काय आहे ?** सांसारिक जीवनात सर्वांगीण विकास व सर्व प्रकारचे भौतिक सुख, यश, समृद्धी प्राप्त करून घेण्यास सनातन धर्माची ती मूळ शिकवण म्हणजेच भक्तियुक्त कर्मयोग साधना व तिचा दैनंदिन जीवनात उपयोग करण्याची कला शिकणे महत्त्वाचे आहे.

राजयोग-भक्तियुक्त कर्मयोग साधना प्रत्येक व्यक्तीच्या अंतःकरणात ईश्वराने इनबिल्ट करून ठेवलेली आहे. त्यामुळे ईश्वराने ही साधना अंगिकारण्यासाठी व्यक्तीला जगातील कोणत्याही बाह्य ज्ञानावर व साधनांवर अवलंबून राहण्याची आवश्यकताच ठेवलेली नाही. राजयोग साधकाला त्या गोष्टी वेळ व काळानूसार उपलब्ध होत राहण्याची जबाबदारी त्याची इष्ट (उपास्य, आराध्य) देवता स्वतःकडे घेते.

**प्रश्न ५२ :** पूजा, अर्चना, होम-हवन, जप-तप, व्रत, स्तोत्र पठण, पोथी वाचन, गुरुचरित्र पाठ, देवी पाठ, भागवत सप्ताह, विविध सेवा, उपवास, गीता पठण, हरीपाठ, ज्ञानेश्वरी पारायण, मनाचे श्लोक, दासबोध पारायण, सत्संग, भजन, कीर्तन, दैनंदिन साधना, देवदर्शन, तिर्थयात्रा वगैरे वगैरे अशा सर्व गोष्टींचे काही महत्त्व नाही का ? सर्व संतांनी त्या गोष्टी जनमानसात का रूजविल्या ? त्यांचे महत्त्व काय व राजयोग साधकांस त्यांचा काय उपयोग असतो ?

**उत्तर :** त्या सर्व आध्यात्मिक क्रियांचे महत्त्व आहेच. तमोगुणी लोकांपासून सत्वगुणी लोकांचे अस्तित्व टिकून राहण्यासाठी त्या गोष्टी केल्याशिवाय पर्याय नाही. म्हणूनच सर्व संतांनी त्या जोपासल्या व प्रचलित केल्यात. त्यांच्या काळात ते महत्त्वाचे होते.

राजयोग साधकांच्या बाबतीत सुद्धा अशा सर्व आध्यात्मिक क्रिया आत्म्याची ईश्वराप्रती असलेली नैसर्गिक अशी दिव्य विनम्रता व्यक्तीच्या मन, बुद्धी, चित्त व अहंकार या पातळीवर जागृत व स्थिर होण्यास मदतच करतात.

दिव्य विनम्रतेची जागृती झाल्यामुळेच व्यक्तीला आत्मनिवेदन भक्तीतून आपल्या इष्ट देवतेशी संबंध स्थापित करण्यात यश येते. तीच त्यांची खरी उपयुक्तता आहे. परंतु हे लक्षात घेतले पाहिजे की त्यांचा साधन म्हणून उपयोग आहे, ते साध्य नाही.

भगवद्गीतेचा अभ्यास केल्यास सहज लक्षात येते की, अर्जुनाने भगवान श्रीकृष्णांशी **आत्मनिवेदन भक्तीतून** संवाद साधला आहे व भौतिक जीवनात यश मिळविण्यासाठीचे योग्य असे मार्गदर्शन प्राप्त करून घेतलेले आहे. म्हणूनच सांसारीक जीवनात **आत्मनिवेदन भक्ती** सर्वात श्रेष्ठ आहे व ती आवश्यक पण आहे.

सांसारिक जीवनात भौतिक उन्नती प्राप्त करण्यासाठी आपल्या इष्ट देवतेशी आत्मनिवेदन भक्तीतून संवाद साधणे आवश्यक असते.

राजयोग (भक्तियुक्त कर्मयोग) साधनेच्या सूत्रात सर्व प्रकारच्या आध्यात्मिक क्रिया एकत्रित झालेल्या आहेत. त्यामुळे साधकाला दैनंदिन जीवनात कर्तव्य कर्मांकडे दुर्लक्ष करून आध्यात्मिक क्रियांकडे अतिलक्ष देण्याची आवश्यकताच राहत नाही. त्यांना विश्वास असतो कि वेळेनुसार इष्टदेवता त्या गोष्टी त्यांच्याकडून आवश्यक त्या प्रमाणात करवून घेत असते.

''त्या सर्व गोष्टी संन्यास आश्रमात अति महत्त्वपूर्ण असतात. कारण संन्यासी जीवनात सांसारिक जीवनातील कर्तव्य कर्माने इष्ट देवतेची पूजा, अर्चना, वगैरे वगैरे करणे शक्यच नसते''.

सांसारिक जीवनात कर्तव्य कर्मांकडे लक्ष न देता फक्त आध्यात्मिक क्रियांवर लक्ष केंद्रित केल्यास प्रारब्ध कर्मानुसार आलेल्या व येणाऱ्या वाईट कर्म फळांमुळे जीवनातील येणारी दुःखे, संकटे सहन करण्याची मानसिक शक्ती मिळते. तसेच त्यांच्या प्रभावात क्रियमाण कर्मे दूषित न होण्यासाठी इष्ट (उपास्य /आराध्य) देवतेकडून सहाय्यता पण मिळते. सर्व आध्यात्मिक क्रियांचा हाच मुख्य फायदा होतो.

परंतु स्वधर्मानुसार निश्चित झालेली कर्तव्य कर्मे दुर्लक्षित केल्यास नवविधा भक्तिंतील सर्व प्रकारच्या आध्यात्मिक क्रिया भौतिक यश, सुख, समृद्धी, पारिवारीक स्थैर्य व सर्वांगीण विकास साध्य करण्यास व्यक्तीला पोषक ठरण्याची खात्री नसते.

सांसारिक जीवनात भौतिक यश, सुख, समृद्धी व सर्वांगीण विकास प्राप्त करण्यासाठी वाईट प्रवृत्तीच्या लोकांचे योग्य असे नियंत्रण होणे पण आवश्यक असते व त्यासाठी प्रत्येक व्यक्तीस स्वधर्मानुसार प्राप्त झालेली कर्तव्य कर्मे केल्यास इष्ट (उपास्य/आराध्य) देवतेची सटीक मदत होते. म्हणजेच इष्ट (उपास्य/आराध्य) देवतेच्या तारक व मारक अशा दोन्ही शक्तींचे पाठबळ मिळते. भौतिक जीवनात यश मिळण्यात त्या दोन्ही शक्तींचे सहाय्य आवश्यक असते.

-------oOo-------

## लेखकाचा परिचय



श्रीकांत रामचंद्र देशमुख हे भगवान श्रीकृष्ण व अर्जुन यांचे शिष्य आहेत. गॅलेक्सी लॅबोरेटरीज प्रायव्हेट लिमिटेड या नावाने ओळखल्या जाणाऱ्या भांडवलीय उपक्रमातून (व्हेंचर कॅपिटल) स्थापन झालेल्या कंपनीचे ते संस्थापक व प्रवर्तक आहेत. गॅलेक्सी ही फार्मास्युटिकल इंटरमीडिएट्स, कृषी आधारित उपयुक्त रासायनिक उत्पादने, परफ्यूमरी इंटरमीडिएट्सची निर्मिती करणारी कंपनी आहे. कंपनीचे छत्रपती संभाजीनगर आणि नेवासा, महाराष्ट्र-(भारत) येथे २ युनिट्स आहेत. कंपनीची संकल्पना १९९४ मध्ये भांडवलीय उपक्रम निधीद्वारे (व्हेंचर कॅपिटल फंडिंग) झाली आहे. श्रीकांत देशमुख यांच्या नेतृत्व व मार्गदर्शनातून कंपनीने विकसित केलेल्या नावीन्यपूर्ण रासायनिक तंत्रज्ञान आणि अद्वितीय अभियांत्रिकी कौशल्यांमुळे कंपनी प्रगती करत आहे.

एका लघु उद्योगाला वेगाने वाढणाऱ्या या यशस्वी उद्योगसंस्थेमध्ये विकसित करण्याचे यश हे अर्जुनाला आदर्श मानून श्रीमद्‌भगवद्‌गीतेच्या व्यावहारिक ज्ञानाचे व त्यामुळे केलेल्या विवेकपूर्ण प्रयत्नांचे प्रकटीकरण आहे.

मुख्यतः मागील ३७ वर्षांपासून, श्री. देशमुख आपल्या दैनंदिन कार्यात श्रीमद्भगवद्गीतेचे चरणबद्ध आकलन करत असून ते ज्ञान आत्मसात करत दैनंदिन व्यावहारिक जीवनात उपयोग करण्याचा प्रयत्न करत आहेत व येणाऱ्या अनुभूतींचा पाठपुरावा करत आहेत.

राजयोगाच्या अभ्यासावरील ही आध्यात्मिक अनुभूती त्यांनी केलेले श्रीमद्भगवद्गीतेचे मूल्यमापन आणि अनुभवलेले ज्ञान यावर आधारित आहे.

श्री. देशमुख हे आयसीटी (UDCT), मुंबई येथून केमिकल टेक्नॉलॉजी (फार्मा) मध्ये बी. टेक. झालेले आहेत. त्यांनी बहुराष्ट्रीय फार्मा कंपन्यांमध्ये उच्च पदावर काम केलेले आहे आणि उच्च तंत्रज्ञानाच्या वैज्ञानिक नवकल्पनांमध्ये ते निपुण आहेत. त्यांनी केलेल्या संशोधनावर आधारित पेटंट्स कंपनीचा मुख्य आधार आहे.

लेखक हे स्वतः राजयोग म्हणजे भक्तियुक्त कर्मयोगाचे साधक आहेत व कंपनीतील सर्वांना राजयोग साधनेचे मार्गदर्शन करून त्यांच्याद्वारे रोजच्या जीवनात राजयोग साधना करून घेत आहेत. अशा प्रकारे श्रीमद्भगवद्गीतेतील मूळ शिकवणींचा सामूहिक जीवनात प्रसार करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

**टीम गॅलेक्सी**

GLPL®
Galaxy Laboratories Private Limited

------०O०------

BYK YOG

# BYK योग आध्यात्मिक फोरम

बीवायके योग (BYK Yog) आध्यात्मिक फोरम ही एक लोककल्याणकारी (स्वयंसेवी/अशासकीय) संस्था आहे. या संस्थेचे मुख्य ध्येय श्रीमद्‌भगवद्‌गीतेतील मूळ शिकवण समाजात सर्व स्तरांवर जागृत करण्याचे आहे.

या सॉफ्टवेअर व डिजिटल काळातील वैज्ञानिक युगात निर्माण झालेल्या गतिशील व आव्हानात्मक अशा व्यक्तिगत, कौटुंबिक व वैश्विक जीवनशैलीत समाजातील विविध स्तरांवर कार्यरत असलेल्या व्यक्तींना श्रीमद्‌भगवद्‌गीतेतील मूळ शिकवणींची लौकिक जीवनात उपयुक्तता व प्रासंगिकता स्पष्ट करणे हा या संस्थेचा एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे.

भक्तियुक्त कर्मयोग म्हणजेच राजयोग साधना. ही योग पद्धती सनातन आहे. परंतु काळाच्या ओघात लुप्त झाल्यामुळे ती पुनर्जागृत करण्याचा हा उपक्रम आहे. भक्तियुक्त कर्मयोग साधना वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक तसेच राजनैतिक आयुष्यात सुद्धा सुख, यश, स्थैर्य व समृद्धी प्राप्त करून देण्याची खात्री देते व व्यक्तीस राजयोगी बनवते.

राजनैतिक क्षेत्रात कार्यरत असलेले श्रेष्ठवर, विद्वान मंडळी तसेच उद्योजक, शेतकरी, व्यापारी, व्यावसायिक, नोकरदार वर्ग, कामगार बंधू, सर्व जाती-धर्मातील व सर्व वयोगटातील स्त्री-पुरुष, पत्रकार, मीडिया हाऊसेस व

आध्यात्मिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या व्यक्ती अशा सर्वांसाठी ती सारखीच प्रभावशाली व यश देणारी सोपी व सरळ अशी योगपद्धती आहे.

देशाच्या उन्नतीचा मार्ग प्रशस्त करण्यासाठी पण हा उपक्रम महत्त्वाचा आहे. प्रत्येक व्यक्तीचे आपल्या देशाप्रती व ईश्वराप्रती असलेले ते उत्तरदायित्व आहे.

सनातन धर्माची ही शिकवण पुनर्जागृत होणे म्हणजे राष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीस आत्मनिर्भर होण्याची ही विद्या शिकविणे व समाजात ती संस्कारीत करणे. देशातील प्रत्येक व्यक्ती सुखी, समृद्ध, समाधानी होण्याच्या दृष्टीने सनातन धर्माची पुनर्जागृती हा एक महत्त्वाचा किंबहुना एकमेव पर्याय आहे. त्या प्रक्रियेतील हा एक छोटासा प्रयत्न आहे. हीच रामराज्य स्थापित होण्याची संकल्पना आहे.

या संस्थेचे कामकाज आध्यात्मिक व सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेले स्त्री-पुरुष, BYK योगचे साधक व उद्योजक चालवितात. ही सेवाभावी स्वयंसेवी संस्था (NGO) देणगीदारांच्या देणगीवर, सभासदांच्या आर्थिक मदतीवर, देशातील सेवाभावी संस्थाच्या व सेवाभावी व्यक्तींच्या सहकार्याने चालवली जाते.

-------०O०-------

# राजयोग – उन्नत सांसारिक जीवनासाठी योग






ईश्वर किंवा परमेश्वराचे विश्वरूप म्हणजे स्वतःच्या आवडत्या इष्ट, आराध्य, उपास्य देवतेचे विश्वरूप परमात्मा स्वरूप होय.

❖ अदृश्य अहंकार व त्याचे ६ गुणधर्म दर्शवणारे वैचारिक चित्र म्हणजेच या दृश्य अभूतपूर्व विश्वाचे प्रकटीकरण :

अहंकार विश्वाच्या विपरीत गुणधर्मांच्या सूक्ष्म दुहेरी स्वरूप असलेल्या सुप्तशक्तीचे प्रतिनिधित्व करतो. अहंकार त्याच्या ६ सूक्ष्म दुहेरी सुप्तशक्ती असलेल्या गुणधर्मांच्या स्वरूपात या अभूतपूर्व विश्वाची तसेच मानवी जीवनाची निर्मिती, देखभाल, पालनपोषण आणि विनाश यासाठी जबाबदार आहेत.

मानवी शरीराच्या DNA ची निर्मिती अहंकाराच्या शक्तीनेच होते. डीएनए (डीऑक्सीरिबोन्यूक्लिक ॲसिड) हा एक लांबलचक रेणू आहे ज्यामध्ये व्यक्तीचा अद्वितीय अनुवांशिक कोड असतो).

ही चित्रे अभूतपूर्व विश्वाचे प्रतिनिधित्व करतात, जे आकर्षण आणि प्रतिकर्षणाच्या सुप्त दुहेरी शक्तींचे सह-अस्तित्व दर्शवतात. ही अभूतपूर्व विश्वाच्या अहंकाराची अभिव्यक्ती आहे. सूक्ष्म दुहेरी स्वभाव असलेली सुप्त शक्ती ब्रह्मांड आणि जीवन गतिमानपणे स्थिर ठेवतात. अहंकार - म्हणजेच सूक्ष्म दुहेरी स्वभाव असलेली सुप्त शक्ती जी विश्वाच्या आणि सांसारिक जीवनाच्या सर्व विपरीत स्वभाव असलेल्या जोड्या स्थिर करते.

उदाहरण: चुंबकाचे दोन ध्रुव आणि त्या दोन्ही चुंबकीय क्षेत्रांना नेहमी एकत्र ठेवणारे चुंबकातील बळ. चुंबकाचे अस्तित्व या शक्तीवर अवलंबून असते आणि ही शक्तीच चुंबकाची ओळख असते.

(संदर्भ पृष्ठ ११३ ते ११६ व १९२ ते १९६ पाहावे)

# राजयोग साधनेतील सात आधार चक्रे व त्यांची कार्यपद्धती




(संदर्भ : तक्ता क्रमांक २ ते १३; पृष्ठ ५९ ते ७१ अभ्यासावे)

## प्रभू श्रीराम

प्रभू श्रीरामाच्या सांसारिक जीवनातील महत्त्वाच्या घटना
भक्तियुक्त कर्मयोग साधनेचे सूत्र शिकवतात.
(ईश्वराने प्रभू श्रीराम यांच्या रूपात मानवी अवतार घेऊन
भक्तियुक्त कर्मयोग साधनेची शिकवण प्रस्थापित केली आहे)



सांसारिक जीवनात स्वधर्म, आपले कर्तव्य कर्म आणि आपल्या इष्ट (आराध्य) देवतेची सेवा या तीन गोष्टी आपल्या पुरुषार्थाने एकरूप केल्याने सुख, शांती आणि समृद्धी प्राप्त होते. वरील तिन्ही गोष्टींचे मार्गदर्शन करणारे ईश्वराचे मानवी रूप : भगवान श्रीराम, माता सीतादेवी, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न आणि श्री हनुमान इ.

